
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

जानेवारी - मार्च २००५

र्ष : सव्विसावे

ंक : पहिला



## प्रस्तावित वनकायदा विशेषांक

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. विजय भानू |
| सचिव | : | डॉ. एस. आर. वाळिंबे |
| सह सचिव | : | अभय कुदळे |
| खजिनदार | : | पुरूषोत्तम आगाशे |
| सभासद | : | वाहरू सोनावणे |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | जयवंत मंत्री |
| | : | ग. शां. पंडित |
| | : | डॉ. कल्पना मुटाटकर |
| | : | डॉ. सुधाकर मोराणकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता। वंदन करितो पददलिता ॥
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : सव्विसावे | जानेवारी-मार्च २००५ | अंक: पहिला

## अनुक्रमणिका

संपादकीय ........ २

श्री. रा. वि. भुस्कुटे यांचे आदिवासींसाठी प्रस्तावित वन कायदा या विषयावरील लेख

१. जंगलवासी जमातींसाठीचा प्रस्तावित वन कायदा ........ ३
२.अनुसूचित जमाती (वनाधिकार मान्यता) विधेयक २००५ - प्रस्तावित कायदा ........ ६
३.अनुसूचित जमाती (वनाधिकार मान्यता) विधेयक २००५ - टिपणी ........ ९
४. प्रस्तावित कायदा -प्रकरण दोन ........ १६
५.आदिवासी कायद्याची मुदत वाढवलीच पाहिजे ........ १९

श्री. शरद कुलकर्णी

- आदिवासी विकास धोरण - एक उपेक्षित प्रश्न ........ २३

श्री. मिलिंद बोकील

- आपणातले आदिवासी आणि आदिवासीतले आपण ........ २७

डॉ. धैर्यशील शिरोळे

- बस्तर - एक निसर्ग सुंदर प्रदेश ........ ४५

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

◆ **विशेष सहाय्य**
विदुला पुरोहित

◆ **अक्षर जुळणी**
आरती परदेशी

अंक मूल्य २५ रूपये

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुद्रण स्थळ व मुखपृष्ठ मांडणी**
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०.

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय....

आदिवासींचे जंगल, जमीन, पर्यावरणाशी अतूट नाते; म्हणूनच हाकारा'ने आतापर्यंत याच विषयांशी संबंधित बरेच लेखन प्रसिद्ध केलेले आहे. १९२७ साली ब्रिटिशांनी केलेल्या वनकायद्यामुळे आदिवासींवर एकप्रकारे जुलुमच केला होता. याचे प्रतिबिंब महात्मा फुलेंच्या साहित्यात उमटले आहे. त्यावरून हा कायदा किती अन्यायी होता, हे लक्षात येईल.

जंगलातील झाडे, फळे, फुले, प्राणी, पक्षी म्हणजे एकंदरीत सर्व निसर्ग हीच आदिवासींची संपत्ती. आपल्या संपत्तीचे रक्षण कसे करायचे हे जो तो जाणतोच. पण ब्रिटिशांनी वनकायदा करुन आदिवासींना त्यांच्या संपत्तीपासून बेदखल केले आणि शासकीय मालकी त्यावर लादली. म्हणजेच एक प्रकारे लुटीचाच मार्ग अवलंबिला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या परिस्थितीत बदल होईल असे वाटले होते; परंतु आपल्या सरकारने ब्रिटिशांचा वनकायदा न बदलता तो तसाच चालू ठेवून वनधोरणे जाहीर केली. काही पर्यावरणवाद्यांच्या जागृतीमुळे अखेरीस १९८० साली केंद्र सरकारने 'वनसंरक्षण कायदा' केला आणि सर्वाधिकार केंद्राच्याच ताब्यात ठेवले. त्यामुळे फरक एवढाच झाला की ब्रिटिश सरकार गेले आणि आपले सरकार आले, पण धोरणात मात्र फारसा बदल झाला नाही. या सततच्या अन्यायांमुळे आज आदिवासी जंगलापासून तुटत चालला आहे, असे म्हणावे लागते. ही परिस्थिती वेळीच लक्षात घेऊन सरकारने योग्य पावले उचलणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी प्रस्तावित नवीन कायदयाचा मसुदा समोर आला आहे. या विषयाचे गाढे अभ्यासक व तज्ज्ञ श्री. रा. वि. भुस्कुटे यांनी यावर सविस्तर ऊहापोह केला आहे व तोच या अंकाचा मुख्य विषय आहे.

प्रस्तावित वन अधिकार विधेयकाबद्दलची माहिती या अंकात आहेच. शिवाय त्या विधेयकाचा मसुदा सुद्धा सोबत दिला आहे. ही एकत्रित माहिती अभ्यासकांना व वाचकांना उपयोगी पडणारी आहे.

मागील २००४ या वर्षात आम्ही 'हाकारा'चा 'आदिवासी विकास धोरण' विषयावर विशेषांक प्रकाशित केला आहे. त्यात आदिवासी म्हणजे नेमके कोण? हे स्पष्ट होत नाही, असे आदिवासी विकास विषयाचे तज्ज्ञ श्री. शरद कुलकर्णी यांना जाणवले आणि म्हणून त्यांचा या उपेक्षित प्रश्नाची बाजू मांडणारा लेख या अंकात प्रसिद्ध केला आहे.

मराठीतील समाजशास्त्रीय अंगाने लेखन करणारे प्रसिध्द लेखक श्री. मिलिंद बोकील यांचा आदिवासी म्हणजे नेमका कोणता समाज, या विषयाचा परिचय करुन देणारा लेख या अंकात दिला आहे. वाचकांना आदिवासी जीवन-संस्कृती व समस्यांची नव्याने ओळख या लेखामुळे होणार आहे.

वाचकांच्या, अभ्यासकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास आम्ही इच्छुक आहोतच.

कार्यकारी संपादक

# जंगलवासी जमातींसाठीचा प्रस्तावित वन कायदा

रा. वि. भुस्कुटे

जंगल आणि जंगलात राहणारे ...ासी यांचे अतूट नाते आहे. जंगल आणि जगलवासी यांना वेगळे करताच येणार नाही इतके ते एकजीव आहेत. जंगलात निवास करणाऱ्या आदिवासी जमाती जंगलातील पर्यावरणीय संसाधनांचे जतन करण्यासाठी कशी आणि किती जीवापाड धडपड करत असत, याबद्दलच्या अनेक आख्यायिका पौराणिक हस्तलिखितातून, ग्रंथातून आजही वाचायला मिळतात. शतकानुशतके आणि पिढ्यान्‌पिढ्या जंगलवासियांनी भारतात सर्वत्र जतन केलेल्या देवराया हा याचा सज्जड पुरावा आहे.

## भारताची लूट करणारा वन कायदा

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी भारतात आपली सत्ता स्थापन केली. भारतातील जंगल व त्यातील आदिवासी जंगलवासी यांच्या घनिष्ट वास्तव संबंधाकडे ब्रिटिश सत्तेने स्वार्थापोटी हेतुतः दुर्लक्ष केले. भारतातील जंगलसंपत्तीची यथेच्छ लूट करता यावी तसेच त्यावेळच्या परिस्थितीचा पुरेपुर फायदा उठवून केवळ आर्थिक फायदा डोळ्यापुढे ठेऊन भारतात वनखाते निर्माण केले. भारतातील खाजगी मालकी नसलेल्या सर्व सरकारी पडीत जमिनी, माळराने, टेकड्या डोंगर, पर्वत, गायराने या नवनिर्मित वनखात्याकडे सुपूर्द केली. खेडेगावात राहणारे शेतकरी, जंगल निवासी आदिवासींना वनखात्याच्या जमिनीत त्यांची गुरे, शेळ्या, मेंढ्या वगैरे चरण्यासही सक्त मनाई केली.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकांत ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी निर्माण केलेल्या या जुलमी वनकायद्याबद्दलचा खालील उतारा सुविख्यात आहे..

पूर्वी ज्या शेतकऱ्यांजवळ थोडी शेती असे व ज्यांचा आपल्या शेतीवर निर्वाह होत नसे ते आसपासच्या डोंगरावरील, दऱ्याखोऱ्यातील जंगलातून उंबर, जांभूळ वगैरे झाडांची फळे खाऊन व पळस, मोहा इत्यादी झाडांची फुले, पाने आणि जंगलातून तोडून आणलेला लाकूडफाटा विकून पट्टी पासोडी पुरता पैसा जमा करीत. गावचे गायरानाचे भिस्तीवर एक दोन गाया व दोन चार शेरडया पाळून त्यांच्यावर जेमतेम गुजारा करत, मोठ्या आनंदाने आपल्या गावीच राहत असत; परंतु 'आमचे मायबाप सरकारचे कारस्थानी युरोपियन कामगारांनी आपली विलायती अष्टपैलू अक्कल सर्व खर्ची घालून भले मोठे टोलेजंग जंगलखाते नवीनच उपस्थित करत त्यामध्ये एकंदर सर्व पर्वत, डोंगर, टेकड्या, दरीखोरी व त्यांचे भरीस पडीत जमिनी व गायराने घालून फॉरेस्ट खाते शिखरास नेल्यामुळे दीन दुबळ्या पंगु शेतकऱ्यांचे शेरडा करडास या पृथ्वीचे पाठीवर रानचा वारासुद्धा खाण्यापुरती जागा उरली नाही.'

(महात्मा फुले, शेतकऱ्यांचा आसूड)

## अधिक धान्य पिकवा मोहिमेत अतिक्रमणाला प्रोत्साहन

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दुसऱ्या महायुद्धानंतर

निर्माण झालेल्या भयानक अन्नटंचाईला, दुष्काळाला भारताला तोंड द्यावे लागले. अधिक धान्य पिकवा मोहीम राबवणे भाग पडले. त्यासाठी ग्रामीण जनतेला सरकारी जागांतून अतिक्रमण करण्यास प्रोत्साहन द्यावे लागले. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य लढ्यात शेतकऱ्यांना, भूमीहीनांना कसायला जमीन देण्यात येईल. या दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे भाग पडले. परिणामी वनजमिनीसह सरकारी पडीत जमिनी भूमीहीनांना अत्यल्प भूधारकांना मोठ्या प्रमाणावर मंजूर करण्यात आल्या. परिणामी भारतीय वन कायदा १९२७ ची अंमलबजावणी थोडी बाजूला ठेवणे भाग पडले.

## अतिक्रमण हटाव मोहीम सुरु

पहिली आणि दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वीपणे पार पडली. परिणामी देशातील हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. त्याच काळात हायब्रीड बियाणाचा शोध लागला. एकरी धान्य उत्पादनात वाढ झाली. फलस्वरूप देश अन्नधान्याच्या बाबतीत केवळ स्वयंपूर्ण नव्हे; तर भारतातून अन्नधान्य निर्यात होऊ लागले. तेव्हा गरज सरो आणि वैद्य मरो या न्यायाने आदिवासींची वनातील अतिक्रमणे निष्ठुरपणे हटविण्यास सुरुवात झाली.

## आदिवासी अतिक्रमणदाराचा उठाव

वनकायद्याच्या कडकपणे अंमलबजावणीस सुरुवात झाली. आदिवासींनी त्याविरूद्ध प्रचंड उठाव केला, मोर्चे काढले, धरणे धरली, सत्याग्रह केले. शेकडोंनी तुरुंगवास भोगला. शासनाला माघार घेणे भाग पडले. जंगलातील आदिवासींची अतिक्रमणे नियमानुकूल करणे भाग पडले. त्यासाठी १९६७ पासून १९७९ पर्यंत पाच ठराव करण्यात आले. त्याबद्दलचा शेवटचा ठराव १२ सप्टेंबर १९७९ रोजी करण्यात आला. १ एप्रिल १९७२ ते ३१ मार्च १९७८ या कालावधीतील अतिक्रमणे नियमानुकूल करणारा हा ठराव होता. या ठरावाची पूर्ण अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही. असे असले तरी १९६० पासून हजारो आदिवासींची अतिक्रमणे नियमानुकूल होऊन त्यांचे नावे वनजमिनी मंजूर झालेल्या आहेत.

## कालबाह्य वनकायदा १९२७ चा अंमल ८७ वर्षांनंतरही चालू

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा भाग म्हणून परक्या ब्रिटिश सरकारच्या जुल्मी १९२७ च्या वन कायद्याविरूद्ध जंगल सत्याग्रह ठिकठिकाणी करण्यात आला होता. शेकडोंनी तुरुंगवास पत्करला होता. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला; परंतु वन कायदा १९२७ अंमलात राहिला. १९५२ मध्ये प्रथम व १९८८ मध्ये दुसऱ्यांदा लोकसभे वन धोरण जाहीर केले; परंतु नवल म्हणजे ही वनधोरणे अंमलात आणण्यासाठी भारत सरकारने कालबाह्य ब्रिटिशांचा जुलमी १९२७ चा वन कायदा काही बदलला नाही. भारतातील बुरसटलेल्या, स्वार्थी जैसे थे वादी नोकरशाहीचे हा कायदा चालू ठेवण्यात हितसंबंध गुंतलेले आहेत.

## पर्यावरणवादी व जागतिक बँकेचे कारस्थान

आदिवासींची वन जमिनीमधील अतिक्रमणे नियमानुकूल होऊन त्यांना जमीन मंजूर करणारे ठराव शासनाने मंजूर केल्यावर तथाकथित शहरी

पर्यावरणवाद्यांनी त्याविरूद्ध उठाव केला. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. तसेच जागतिक बँकेनी दबाव आणला तेव्हा केंद्र सरकारने १९२७ च्या ब्रिटिशकालीन वनकायदा अधिक कडक करण्यासाठी त्यात सुधारणा केली. १९८० चा वन ण कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे व चित्र पालटले आहे. वनजमिनीबद्दलचे सर्वाधिकार केंद्र सरकारच्या वन आणि पर्यावरण खात्याकडे सुपूर्द झालेले आहेत.

एक तसूभर वन जमीनही राज्यसरकारला मंजूर करण्याचा अधिकार राहिलेला नाही. भारतातील आदिवासी जमातीच्या जीवनामध्ये पिढ्यान्‌पिढ्या मुरलेल्या पर्यावरण संरक्षणाच्या विपुल परंपराचे अनुकरण करण्याऐवजी आम्ही पाश्चात्य आंतरराष्ट्रीय कल्पनांचे अती उत्साहाने अनुकरण करण्यास सुरुवात केली. काहीही करून वनाखालील क्षेत्र विस्तारित करणे, राखीव जंगलात वाढ करणे, बलाढ्य राष्ट्रीय उद्यानांची, अभय अरण्यांची स्थापना करणे या सर्व प्रक्रियेमध्ये वनांमध्ये कायमची वस्ती करुन राहणाऱ्या जंगलवासी आदिवासी यांच्या यथार्थ गाऱ्हायांण्याकडे मात्र सरकसट दुर्लक्ष करण्यात आले.

आदिवासींचा सरळ साधा स्वभाव, भोळेपणा, सच्चेपणा तसेच आधुनिक कायदे नियम आणि कार्यपद्धतीबद्दलची अनिभिन्नता यामुळे स्वता:चे हक्क बजावण्यात ते असमर्थ ठरले. तसेच त्यांच्या सभोवतालच्या नैसर्गिक साधनांवरील त्यांचे यथार्थ अधिकार बजावण्यातही ते कमी पडले. आधुनिक वन संरक्षणाच्या दृष्टिकोमात एकात्मता साधण्याऐवजी वगळण्याच्या कल्पनांना प्राधान्य देण्यात आलेले आहे. अगदी अलिकडच्या काही वर्षात केंद्र आणि राज्यसरकारच्या वनखात्याला धोरणात्मक वनव्यवस्थापन प्रक्रियेत जाणवू लागले आहे की, जंगलवासी आदिवासी, ज्यांचे दैनंदिन जीवन सर्वस्वी जंगलातील संसाधनांवर अवलंबून आहे, त्यांच्या एकात्मिक सामुदायिक सहभागानेच जंगलाचा खराखुरा सर्वांगीण विकास साधता येईल. तेव्हा जंगल चांगले टिकून राहून त्यांचे संरक्षण आणि भरभराट करण्यासाठी जंगलवासी आदिवासी जमातींचा सहभाग राष्ट्रीय स्तरावर सर्वत्र अत्यावश्यक आहे. ज्या जंगलात आपण पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्य करुन राहिलो, जीवनाचा आनंद उपभोगला त्यात जंगलातून आपल्याला केव्हाही हुसकावून लावण्यात येईल.

या जबरदस्त धास्तीमुळे परिणामत: जंगलाबाबतची भावनिक ओढ आदिवासी जमातीची कमी होऊ लागली आहे. जंगलाबद्दल, जंगल जमिनीबाबत एक प्रकारचा परकेपणा त्यांच्यामध्ये निर्माण होऊ लागला आहे. तेव्हा आम्ही असामाजिक तत्वांकडून आमच्या जंगलाचा पुरता विनाश होण्यापूर्वीच सावध होऊन आमच्याकडून झालेला हा ऐतिहासिक अन्याय तातडीने दुरुस्त करणे गरजेचे आहे.

केंद्र सरकारने जंगलवासी आदिवासी जमातीचे जंगलातील हक्कांना मान्यता देण्यासाठी व ते त्यांना प्रदान करण्यासाठी एक कायदा करण्याचे ठरविले आहे. सर्व प्रकारच्या जंगलातील जमिनींवर जंगलवासी आदिवासी जमाती पिढ्यान्‌पिढ्या जे हक्क, अधिकार उपभोगत आहेत, स्वत: दैनंदिन जीवन जगण्यासाठी जंगलातून गरजा भागवत आहेत,

( पृष्ठ ८ वर पहा)

# अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) विधेयक २००५

## प्रस्तावित कायदा

१. वनांबद्दलची आजपर्यंतची नीती/धोरण पश्चिमेकडील विचारप्रणालीवर आधारित राहिलेली आहे. ज्यामध्ये वनाचा व्यापारी उपयोग करण्यावर सर्वाधिक भर राहिलेला आहे. परंतु अलिकडे डिसेंबर २००४ मध्ये केंद्रीय वनमंत्रालयाने आपल्या नव्या वननीतीच्या खुलाशामध्ये असे नमूद केलेले आहे की, वनात वास्तव्य करुन राहणाऱ्या आदिवासी जमातीवर झालेल्या ऐतिहासिक अन्यायाचे परिमार्जन करण्यात येईल. आदिवासी समाज सुदृढ बनविण्यात येईल. तसेच व्यवहाराचा, संस्कृतीचा केंद्रबिंदू वनसंरक्षण हा राहील.

२. २५ ऑक्टोबर या १९८० अंतिम दिनांकापूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व बाबीं/दावे नियमानुकुल करण्याच्या घोषित केलेल्या नीतीला कायदेशीर उपाय योजनेची चौकट केंद्राचे वन आणि पर्यावरण खाते तयार करत आहे.

३. वनभूमीच्या कायदेशीर संरक्षण समाप्त करण्याची कल्पना यामागे नाही. वास्तवात वनात वस्ती करुन राहणाऱ्या अनुसूचित जमाती जेथे त्या अनुसूचित आहेत, त्यांच्या वनजमिनींवरील कब्जाला मान्यता आणि अधिकार देऊन त्यांच्या कृषिक अधिकारांचे संरक्षणाचा प्रस्ताव या कायद्यात आहे.

४. वन मंत्रालयाचा मूळ विचार पर्यावरणाचा विकास करणे, वनाचे प्रबंधन सामुदायिकपणे करणे, वन्य जीवनासहित वनपरिस्थितीचे सर्वार्थाने संरक्षण व संपोषण करण्याचे कार्यात अनुसूचित जनजातीयांच्या भागीदारीत वाढ करण्यासाठी प्रोत्साहन या कायद्याने देण्यात येणार आहे.

५. जनजातीय समुदायांना वनभूमीचे वाटप करण्याची कल्पना या कायद्याची नाही. वन संरक्षणाच्या प्रक्रियेत ज्या आदिवासींना त्यांच्या अधिकारांपासून वंचित करण्यात आले होते त्यांनाच फक्त वनजमि- पहिल्यापासून असलेल्या त्यांच्या अधिकारांना मान्यता देणे ही कल्पना या कायद्यामागे आहे. नवीन वननीती जनजातीय समुदायांना केंद्रस्थानी ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादन करणाऱ्या नव्या वननीतीची राजनीती ध्यानात ठेवून हा कायदा करण्यात येत आहे.

६. राहण्यासाठी वन अधिकार देण्यामागचा प्रमुख हेतू आदिवासींना त्यांचा निर्वाह करता यावा आणि जगून राहात यावे हाच केवळ आहे. कोणत्याही प्रकारच्या व्यापारी उपयोगासाठी वनाधिकार देण्यात येत नाहीत. वन अधिकार धारण करणाऱ्यांना वनाचे व्यापारी करण्यास मनाई आहे. वन तसेच वनामधील जैविक विविधतेवर दुष्परिणाम घडविणाऱ्या कृत्यांना मनाई करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना ज्या वनभूमीवर अधिकार देण्यात आले आहेत. त्यांचेवर वन सुरक्षित राखण्याची आणि त्या वनाच्या पुनःर्उत्पादनाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

७. वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातीचे अधिकार देतांना वन (संरक्षण) कायदा १९८० आणि पर्यावरणासंबंधात १९९० मध्ये केंद्रातील पर्यावरण आणि वन मंत्रालयाने मार्गदर्शन करण्यासाठी काढण्यात आलेले आदेशांचे पालन वेगळे करता येणार नाही, म्हणजे ते अमलात राहणार आहेत.

८. भारतीय वन कायदा १९२७, वन (संरक्षण) कायदा १९८० किंवा वन्य जीव (संरक्षण) कायदा १९७२ च्या निषिद्धकारी तरतुदींमध्ये या कायद्याचा अधिक्षेप राहणार नाही.

९. १९८० पूर्वीची पात्र अतिक्रमणे नियमानुकूल करणे तारखेला त्यांना कायदेशीर स्वरुप करुन प्राप्त देणे, त्याचप्रमाणे वन गावांचे महसुली गावांत रुपांतर करण्याच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या वन (संरक्षण) कायदा १९८० च्या कक्षेत चाललेल्या प्रयत्नांना हा कायदा प्रोत्साहन देणार आहे.

१०. वन अधिकार धारण करणाऱ्यांनी कायद्याच्या तरतुदींचा भंग केला तर त्यांचे विरूद्ध दंडनीय कार्यवाही करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आलेली आहे. तसेच अशांचे वन अधिकार समाप्त करण्याची तरतूदही करण्यात आलेली आहे.

११. वनांमध्ये राहणाऱ्या समुदायांना स्वत:चे विकासासाठी योजना तयार करणे, त्यांच्याच जोडीला लाभकारक ठरणाऱ्या भिन्न-भिन्न योजना उल्लेखण्याबाबत वन कायद्याच्या नकारात्मक प्रक्रियेमुळे त्यांच्यासाठीच्या विकास योजनांचाही लाभ उपलब्ध होत नव्हता.

१२. वनभूमीवर अतिक्रमण केलेल्या अपात्र असलेल्या अतिक्रमण करणाऱ्याविरूद्ध कारवाई करण्यास हा प्रस्तावीत कायदा प्रतिबंध करत नाही. वास्तविक पर्यावरण आणि वन मंत्रालयानी जारी केलेले भिन्न-भिन्न आदेश/सूचना/परिपत्रके आणि अवलंबलेल्या नीतीमुळे अनुसूचित जनजातींवर जो ऐतिहासिक अन्याय झाला आहे तो दूर करण्यासाठीची विधायक प्रक्रिया हा कायदा सुरु करत आहे.

१३. खरे पाहता वनामध्ये वस्ती करणाऱ्या समुदायाच्या वास्तव दाव्याचा निपटारा करण्यासाठी १९९० पासून केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडून जी प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे त्याची तार्कीक परिणती म्हणजे हा प्रस्तावीत कायदा आहे. केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडून चालू करण्यात आलेल्या प्रयासाने त्याला कायदेशीर स्वरूप देण्यात येत आहे. वन आणि पर्यावरण खात्याच्या कायद्याच्या आणि नीतीमधील भाषेचाच वापर प्रस्तावित विधेयकात करण्यात आलेला आहे. वास्तविकपणे १९९० मध्ये किंवा त्यानंतर दाखविण्यात आलेली धोरणाची दिशा, देण्यात आलेले निर्देशांच्या तुलनेत अगदी समान स्वरुपातील वनाचे संरक्षणवादी पारंपारिक स्वरूप हे प्रास्तावित कायदा आहे. कारण या कायद्यात देखिल दाव्याचा निपटारा करण्यासाठी २५ ऑक्टोबर १९८० याच निर्णायक तारखेला या कायद्याचे अधिकृतपणे मान्यता दिलेली आहे.

१४. प्रस्तावीत विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी संतुलन साधण्यात आलेले आहे. म्हणजे या कायद्यामध्ये पर्यावरण संरक्षण करणे आणि वनात राहणाऱ्या जनजातीयांना न्याय मिळवून देणे या दोन्ही उद्देशांची पूर्ती या कायद्याने करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वर्तमान काळातील वैधानिक/नीतीनुसार चेक आणि बॅलेन्स अधिक कठोरपणे साधण्याची व्यवस्था केलेली आहे.

१५. प्रस्तावीत अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी व्हावी हा हेतू साधण्याकरीता जनजाती कार्य मंत्रालयाने अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) नियम तयार करण्याचा प्रस्ताव

देखिल सादर केलेला आहे. ही बाब निश्चितच उल्लेखनिय आहे. प्रस्तावीत विधेयकांच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की वनात राहणाऱ्या अनुसूचित जातींचे वन अधिकार देण्याची प्रक्रिया सुरु करणारी ग्रामसभा ही सक्षम प्राधिकारी राहील. प्रखंड स्तरावरील समिती ग्रामसभेच्या निर्णयाची समीक्षा करेल, तर जिल्हा स्तरावरील समिती प्रखंड स्तरावरील समितीकडून तयार करण्यात आलेल्या वन अधिकारांनी समीक्षा करणार आहे, त्याचप्रमाणे अचानकपणे विवक्षित ठिकाणांना भेट देऊन तेथे देण्यात आलेल्या वनाधिकारांची समीक्षा करुन मान्यता देण्यांत येईल.

विधेयक मंजूर करण्यात आल्यानंतर, वनातील अधिकांना मान्यता देण्यात आल्यानंतर, प्रत्यक्षात अंमलबजावणी करुन ते सोपविण्याची कार्यपद्धती निश्चित करावी लागणार आहे. याबाबतची व्यवस्था करण्यासाठी असा प्रस्ताव मांडण्यात आला आहे की, महसूल आदिवासी कल्याण विभागाचे अधिकारी, समाजातील विख्यात सदस्य आणि संबंधित विभागातील नागरी समाजातील प्रतिष्ठित सदस्यांना सामील करुन ग्रामसभेसारखी जनतांत्रिक संस्था संघटीत करण्यात यावी जेणेकरुन प्रस्तावीत कायदा मान्य झाल्यानंतर त्याच्या प्रत्यक्षातील अंमलबजावणी प्रक्रिया सुरळीत पार पाडता येईल. ■■

(अनुसूचित जनजाती (वन अधिकारों को मान्यता) विधेयका वरील भारत सरकारच्या जनजाती कार्य मंत्रालयाने प्रसारीत केलेल्या हिंदीतील टिप्पणीचे मराठीतील स्वैर भाषांतर श्री. रा.वि.भुस्कुटे यांनी केले आहे.)

( पृष्ठ ५ वरून पुढे)

त्यांना मान्यता दयावयाची हे मूलभूत तत्व प्रस्तावित कायद्याचे आहे.

या प्रस्तावित कायद्यामध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने अंतर्भाव असणार आहे.

१. जंगल जतन करण्यासाठी, ते विनाशापासून वाचविण्यासाठी आदिवासी जमातींनी पिढ्यान्पिढ्या परंपरेने ज्या पद्धतीचे अनुसरण केले त्याचा वापर करण्यात येईल व त्या अधिक बळकट करण्यात येतील.

२. जंगलवासीय आदिवासी समाजाचे जंगलावरील हक्कांना मान्यता देण्यासाठी साधी सरळ कार्यपद्धती या कायद्याने ठरविण्यात येईल. ही कार्यपद्धती अशी राहील की जिची औपचारिक नोंद प्रशासकीय यंत्रणेला सहजपणे करता येईल आणि त्यामुळे ती कायदेशीरपणे अमलात आणता येईल.

३. जंगलांमध्ये यापुढे आणखी अतिक्रमण होऊ नये म्हणून पुरेपुर प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तरतूद करण्यात येईल. जंगलातील हक्कांना मान्यता देऊन ते प्रदान करण्यासाठी गावपातळीवरील लोकशाही संस्थाचे (उदाहरणार्थ ग्रामपंचायत, ग्रामसभा वगैरे) सहाय्य घेण्याची तरतूद करण्यात येईल.

४. जंगलवासीय आदिवासी समाजाचे एकूण पर्यावरणीय व्यवस्थेमध्ये एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. ते या कायद्याने अधिक बळकट व चिरस्थायी करण्यात येईल. तसेच ज्या आदिवासी समाजाचे जीवन सर्वस्वी जंगलावर आधारित आहे, त्यांना जे कधीही काढून घेतले जाणार नाहीत असे जंगलावरील हक्क प्रदान करण्याची फार जुन्या मागणीची पूर्तता या कायद्याने करण्यात येणार आहे. ■■

# अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) विधेयक२००५

## टिपणी

पार्श्वभूमी :

वनजमिनींवर कब्जा असलेल्या वनामध्ये पिढ्यानूपिढ्या राहणाऱ्यांच्या वनावरील अधिकारांना अजूनपर्यंत मान्यता देण्यात आलेली नाही. वनामध्ये होत असलेल्या परिस्थितीजन्य प्रक्रियेमध्ये त्यातील जिवंतपणामध्ये आणि भरण पोषणामध्ये वनामध्ये वस्ती करुन रहाणाऱ्या वनाचा अविभाज्य अंग असलेल्या अनुसूचित जमातींवर फलस्वरूप ऐतिहासिक अन्याय झाला आहे.

१.अनुसूचित जमाती वनामध्ये पिढ्यानुपिढ्या रहात आल्या आहेत. वनाच्या होणाऱ्या वाढीचा एवढेच नव्हे तर वनाच्या अस्तित्वाचाच जणू त्या एक अविभाज्य भाग आहेत.

हे सर्वसामान्य ज्ञात आहे की अनुसूचित जमाती कित्येक पिढ्या शतकानुशतके वनामध्ये कायम स्वरूपी वास्तव्य करत आहेत. साहजिकच भारतातील जैविक संसाधनांशी त्यांचे परंपरागत स्थानिक संबंध राहिलेले आहेत. वनातील वन्य जीवासह वनामध्ये सदासर्वकाळ अस्तित्वात असलेल्या परिस्थितीशी, स्वयंपोषणाशी त्यांचे घनदाट संबंध राहिलेले आहेत. वास्तविक वस्तुस्थिती ही आहे की, वनातील वन्य जीवासहीत असलेल्या परिस्थितीपासून आदिवासी जमातीच्या लोकांना वेगळे करताच येणार नाही आणि जर त्यांना अलग केले तर ते जगूच शकणार नाहीत. इतके ते वनाशी तादात्म्य पावलेले आहेत.

२. वनजमीनीची वाटणी करताना त्यांच्या अधिकारांना मान्यता देणे

वासाहतीक काळामध्ये तसेच स्वतंत्र भारतामध्येही वनामध्ये वस्ती करून रहाणाऱ्या आदिवासी जमातींच्या वनांवरील पिढीजात पारंपरिक अधिकारांना पुरेशी मान्यता देण्यात आली नाही. राज्या-राज्यातील वन जमिनींची वाटणी करताना म्हणजे वनजमीनींवरील हक्क निश्चिती करताना त्यांना काही एक स्थान देण्यात आले नाही आणि त्यांच्या अपरोक्ष त्यांच्या अधिकारांचा काही एक विचार न करता भारतीय वन कायदा १९२७ मधील तरतुदी ठरविण्यात आलेल्या होत्या.

वनापासून मिळणाऱ्या व्यापारी फायदयाचा फक्त विचार करत त्या काळामध्ये वनातील राखीव क्षेत्र तसेच वनाचे अंशत: राखीव क्षेत्र ठरविताना कोणत्या न कोणत्या स्वरूपातही अनुसूचित जमातींच्या समुदायांच्या वास्तविक हिताचा यत्कींचितही विचार करण्यात आला नाही.

वन संरक्षण अधिनियम १९८० मंजूर करण्यात आल्यानंतर त्यांच्या अडचणींमध्ये आणखीनच भर पडली. त्यांच्या विकासासाठी ज्या थोड्याफार सोयी सवलती देण्यात आल्या होत्या, त्याही व्यापारी स्वरुपाच्या वनसंरक्षणास बाधक आहेत असे सर्रास मानण्यात येऊ लागले. त्यांना देऊ केलेल्या सोयी सवलती रद्द करण्याची त्या काढून घेण्याची उलटी प्रक्रिया सुरु झाली. आज देखील अनुसूचित जमातीला वनामध्ये वास्तविक स्थान

ठेवलेले नाही. वनामध्ये आज त्यांना कोणी ओळखत नाही. त्यांना जणू अस्तित्वहीन बनवले आहे.

३. आपल्या स्वत:च्या भूमीतून बेदखल होण्याचा सततचा धोका:

प्राचीन काळापासून वनामध्ये वास्तव्य करत रहाणाऱ्या अनुसूचित जमातीच्या समुदायांना भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीपासून (वसाहतीक काळात) वनभूमीवर अधिकार न देण्याच्या जुलमी धोरणाकडे भारतातील आम जनतेचे लक्ष वेधले गेले होते.

अनुसूचित जमातीचे समुदाय जे युगानुयुगे वनामध्ये रहात आले आहेत, त्यांना मान्यता नाकारत त्यांना हेतुत: वनभूमीवरील अतिक्रमण करणारे म्हणून वनाचे अधिकारी सर्रास संबोधतात व त्यांचेविरूद्ध कडक कारवाई करत आलेले आहेत. तेव्हा साहजिकच आदिवासी समुदायांच्या मनामध्ये केव्हाही बेदखल होण्याची भीती ठाण मांडून बसलेली आहे. देण्यात आलेल्या वन जमीन पट्ट्यांबाबत त्यांना शाश्वती वाटत नाही.

ज्या वनजमिनींवर ते पिढ्यान् पिढ्या वास्तव्य करत राहिले, जेथे त्यांनी त्यांचे सुख-दुखा:चे क्षण घालवले, जीवन फुलवले त्या जमिनींवरुन बेदखल होण्याच्या सततच्या भीतीमुळे शारीरिक आणि मानसिकरित्याही वनाबद्दल त्यांची आस्था कमी झाली आहे. आता वनाबद्दल त्यांना परकेपणा वाटू लागला आहे. या सर्व कारणांमुळे त्यांचेवर फार मोठा ऐतिहासिक अन्याय झालेला आहे.

४. पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) अधिनियम १९९६ (पैसा) च्या तरतुदीप्रमाणे गौण वन उत्पादनांवर मालकी हक्क नाकारले जाणे.

पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम १९९६ च्या तरतुदी लागू न झाल्यामुळे गौण वन उत्पादनांसहीत स्थानिक नैसर्गिक संसाधनावरील नियंत्रण/मालकी हक्क स्थानिक म्हणजे गावांती समुदायाकडे तसेच संपूर्ण अनुसूचित क्षेत्रामध्ये पैसाची अंमलबजावणी न झाल्यामुळे लोकांच्या समस्यांमध्ये खूपचे वाढ झाली आहे.

पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम १९९६ (पैसा) च्या तरतुदीनुसार गौण वन उत्पादनांवर स्थानिक समाजाचा जरी मालकी हक्क प्रदान केला असला तरी देखील अधिक किंमत असलेली मौल्यवान गौण वन उत्पादनांवर व त्याच्या व्यापारावर राज्याचे निगम आणि वन विभागाचा एकाधिकार आहे आणि परिणामी नेमण्यात आलेल्या कंत्राटदारांकडे आदिवासींना मजूर म्हणून कामाला जुपण्यात येते.

५. विकास योजनांच्या लाभांपासून वंचित ठेवण्यात येते.

एका बाजूला वन संरक्षणाबद्दलच्या वाढत्या अपेक्षा आणि मागण्या, तर दुसऱ्या बाजूला आदिवासी समाजाच्या विविध विकास योजना पार पाडण्यातील कंटाळा आणणारी संथ गती, तर त्यात भर म्हणून वनातील कोणत्याही क्षणी हुसकावले जाण्याची, बेदखल करण्याची भयावह धास्ती यामुळे सामुदायिक सहजीवन जगण्याची परंपरा असलेले आदिवासींचे जीवन भलतेच अशाश्वत आणि असुरक्षित बनले आहे. या सर्वाचे प्रमुख कारण हे आहे की, ते वनभूमीधारक नाहीत. वनजमीन त्यांना

हक्काने उपलब्ध नाही. युगानुयुगे वनजमीनीवर वस्ती करत राहणाऱ्या अनुसूचित समुदायांना इंदिरा आवास योजनेसारख्या सरकारी योजनांचा देखील लाभ घेता येत नाही.

६. पर्यावरण तथा वनमंत्रालयाचा सध्याचा ़ायदा/नीती

वन तसेच वनाच्या जवळपास राहणारे जंगलवासी अनुसूचित जमातीच्या एकसूत्रीकरणाच्या विषयाचा संदर्भ घेऊन वनाचे प्रबंधन करण्याच्या प्रत्येक बाबींवर सरकारचे धोरण ठरत असते. पर्यावरण तथा वन मंत्रालयाने लागू केलेली वननीती १९८८ मध्ये लागू केलेल्या सर्व वननीतींसह सर्वांमध्ये देण्यात आलेले संदेश, काढलेली परिपत्रके, अवलंबायची कार्यपद्धती बाबतचे आदेश या सर्वांमध्ये आदिवासी समुदायांच्या हितरक्षणाचे समर्थन केलेले आहे आणि याही गोष्टींवर सतत जोर देऊन प्रतिपादन करण्यात आले आहे, की वन संरक्षणाच्या सर्व उपाययोजनांमध्ये या समुदायांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे.

पर्यावरण तथा वन मंत्रालयाच्या काही महत्त्वपूर्ण नीती खालीलप्रमाणे सुसंगत आहे.

- १९८८ ची वननीती या बाबीवर जोर देते की, वनांवर आदिवासी जमातीचा प्रथम अधिकार आहे. तेव्हा त्यांच्या घरगुती तसेच जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व गरजा अन्य कोणत्याही व्यापारी आवश्यकतेच्या तुलनेत प्राधान्य क्रमाने पाहिल्या आहेत.
- १९८८ ची वननीती वन आणि आदिवासी समाज यांचे सहजीवन मान्य करते तसेच आदिवासी आणि जंगलवासी यांच्या परंपरागत अधिकारांना हितसंबंधाचे रक्षणही करते.
- या वननीतीमध्ये वनांचे संरक्षण पुनर्उत्पादन आणि विकास साधण्यासाठी आदिवासी जमातीच्या घनिष्ठ संबंधाचा, त्यांना त्यात सामील करून घेण्याला व त्यांना चांगला भरीव रोजगार उपलब्ध करत देण्यासाठी खाली नमूद बाबींकडे खास लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

१. आदिवासींच्या सहकारी समित्यांमार्फत कंत्राटदारांची पुन:प्रस्थापना

२. गौण वन उत्पादनांचे संरक्षण पुन:उर्त्पादन, तसेच त्याचा इष्ट असा संग्रह करण्याबरोबरच त्यांच्या व्यापारांसाठी संस्थांची व्यवस्था करणे.

३. महसुली गावांतील रस्त्यांप्रमाणेच वनगावातील रस्त्यांचा विकास करणे, आदिवासी लाभार्थींची स्थिती सुधारण्यासाठी प्रत्येक परिवारागणीक योजना राबवणे आणि

४. आदिवासी अर्थव्यवस्थेच्या गरजा परिपूर्ण करण्यासाठी एकात्मिक विकास कार्यक्रम राबवणे; परंतु सत्यस्थिती ही आहे की, ज्या गौण वन उत्पादनांची किंमत जास्त आहे ज्यापासून अधिक फायदा मिळतो ती सर्व राज्ये वन नियमाच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट आहेत आणि आदिवासी समाजाचे लोक मजूर म्हणून कामाला जुंपलेले असतात.

- राष्ट्रीय वननीती १९८८ मध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी पर्यावरण आणि वन मंत्रालयामार्फत केंद्र सरकारने विवादास्पद दाव्यांचा निर्णय करण्याच्या हेतूने १८ सप्टेंबर १९९० रोजी

सहा परित्रके काढली होती. या परिपत्रकानुसार १९८० पूर्वी वनामध्ये करण्यात आलेली अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र ठरविण्यात आली होती. त्याचप्रमाणे राज्य सरकारनी त्यासाठी ठरविण्यांत आलेल्या अटी/शर्ती पूर्ण होत असतील तर ती अतिक्रमण नियमित करण्याचा निर्णय जाहिर केलेला होता. तथापि वन संरक्षण अधिनियम १९८० चा अंमल सुरु असल्यामुळे परिपत्रकातील निर्णयाची पूर्णतया किंवा अशंत:ही अंमलबजावणी करता आली नसावी, या परिपत्रकातून खाली नमूद केलेल्या तरतुदी आहेत.

• महसूल, वन आणि आदिवासी कल्याण विभागाची संयुक्त दलाची नियुक्ती करणे.

• ग्रामसभांना सामील करुन घेणे.

• केवळ ढासळणाऱ्या उतारांवर शेती करण्यास प्रतिबंध करणे

• दावेदारांच्या दाव्याची योग्य त्या चौकशीत त्याच्या दाव्याची सिद्धता झाल्यावर भूमीधारकाला वनभूमी देणे.

• दावेदाराला परत केलेल्या जमिनीचे सीमांकन करणे जमिनीच्या आकारावर कोणतेही बंधन राहणार नाही.

• पूरक वनीकरणाच्या प्रस्तावाबरोबरच वन जमिनीचे निर्वणी करणाऱ्याचा प्रस्तावही सादर करणे.

• आदिवासी सहकारी वगैरे संस्थांच्या माध्यमातून दलाली संपुष्टात आणणे. त्याऐवजी कंत्राटदार प्रस्थापित करणे.

• वनीकरणाच्या कामामध्ये आदिवासी व्यतिरिक्त बाहेरील मजूरांना कामाला न लावणे.

• व्यापारी कार्यासाठी लागणारी जनशक्ती अविरत पुरवठा व्हावा जंगलाच्या दुर्गम भागातील वनगावांचे महसुली गावांत रुपांतर करणे.

• वनगावातून निवास करणाऱ्यांनी स्वत:च्या निवासासाठी वापरासाठी जी जमीन कित्येक वर्षापासून वापरलेली आहे, जी त्यांच्या कब्जावहिवाटीत आहे ती त्यांची नाही, असे मानणे उचित ठरणार नाही.

• प्रामुख्याने गुन्हयाची पहिली खबरेच्या साक्षीदारांची साक्ष न स्वीकारणे, अथवा व्यवहारांत: ती मान्य न करणे अयोग्य ठरेल. (अनुसूचित जमाती ठरविण्याचे वेळी तयार करण्यात आलेले काढण्यात आलेले जाहीरनामे, गॅझेटिअर्स, वेगवेगळी महसुली सर्वेक्षणे, आदिवासी अनुसंधान केंद्र वगैरेची कागदपत्रे (डॉक्युमेंटस्) ही याला साक्ष आहेत. यावर साधा विचारही करण्यात आला नाही. जंगलवासी आदिवासी वनांत केव्हापासून वास्तव्य करुन रहातात तो काळच निश्चित करण्यात न आल्यामुळे पिढ्यानूपिढ्या शतकानुशतके वास्तव्य करत रहात असलेल्या आदिवासींना त्यांच्याच हक्काच्या भूमीवर अतिक्रमणदार ठरविण्यात आले आहे.)

पर्यावरण आणि पर्यावरणाच्या २००४ ची वननीतीच्या मसुद्यानुसार राष्ट्रीय पर्यावरण नीतीमध्ये असा उल्लेख केलेला आहे की, वनामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या पारंपरिक अधिकारांना मान्यता दिली पाहिजे. तरच त्यांच्यावर झालेल्या ऐतिहासिक अन्यायाचे परिमार्जन होईल तसेच त्यांचे जीवन सुरक्षित होईल. वनखात्याशी त्यांचा होणारा संघर्ष कमी होईल. त्याचप्रमाणे वनांचे दीर्घकालीन संरक्षण करण्यासाठी आदिवासींना प्रोत्साहन प्राप्त होईल.

## ७. अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) विधेयक २००५ तयार करणे

या पार्श्वभूमीवर पर्यावरण आणि वन मंत्रालयाचे सर्व कायदे/नीती पद्धतीच्या अलाहिदा म्हणजे वेगळा निर्णय घेण्यात आला की, अनुसूचित जमातींच्या ऐतिहासिक अधिकारांना मान्यता देण्यात आलेली नाही. तेव्हा अनुसूचित समुदायांवर झालेल्या या ऐतिहासिक अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी, वन भूमीवरील त्यांचे अधिकारांना पुष्टी देण्यासाठी आदिवासी मंत्रालयाने एक व्यापक केंद्रीय मसुदा तयार करण्यासाठी पाऊल उचललेले आहे.

त्यानुसार अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) विधेयक तयार करण्यासाठी जनजाती खात्याचे सचिवांचे अध्यक्षतेखाली एक तकनीकी सहायता समूह (तांत्रिक सहाय्यता समूह) संघटित करण्यात आला. यामध्ये संबंधित मंत्रालयाचे प्रतिनिधी आणि पर्यावरण संरक्षण आदिवासी समाजाच्या कल्याणाशी घनिष्ट संबंध असलेल्या आणि विपुल अनुभव असलेल्या सुविख्यात विशेषज्ञ यामध्ये होते. महानिर्देशक पर्यावरण आणि वन मंत्रालयाचे एक सदस्यही यामध्ये होते.

तांत्रिक सहाय्य समूहाच्या अनेक बैठका झाल्यानंतर जनजाती कार्य मंत्रालयामार्फत अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) विधेयक २००५ चा मसुदा तयार करण्यात आला आणि संबंधीत मंत्रालयाकडे त्यांच्या त्यावरील टिपणीसाठी पाठविण्यात आला.

पर्यावरण आणि वनमंत्रालय खेरीज विधेयकाच्या मसुद्याला बहुतेक सर्वांनी तो स्वीकारला आहे आणि संबंधित मंत्रालयानी आपल्या सूचनाही दिलेल्या आहेत.

## ८. प्रस्तावीत अनुसूचित जमाती (वन अधिकार मान्यता) विधेयक २००५ -ची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

उद्देश-

जंगलात राहणारे जे आदिवासी पिढ्यानूपिढ्या वनात राहिलेले आहेत. वनातील प्राणी, जीव जंतू यांचे लालन -पालन परिपोषणाचा अविभाज्य अंग बनलेले आहेत. परंतु ज्याच्या अधिकाराची साधी नोंदही घेण्यात आली नसल्यामुळे त्यांच्यावर जो ऐतिहासिक अन्याय झालेला आहे, त्यांचे परिमार्जन करणे हा विधेयकाचा उद्देश आहे.

८.१ जंगलात राहणाऱ्या आदिवासींचे अधिकार

या विधेयकाच्या प्रकरण ४ मध्ये जंगलात राहणाऱ्या आदिवासी जमातींना जेथे ते अनुसूचित म्हणून गणले जातात त्यांच्या वनावरील अधिकारांना मान्यता देणे तसेच ते अधिकार त्यांना प्रदान करणेची तरतूद करण्यात आलेली आहे. तर या विधेयकातील प्रकरण तीन हे ज्या वनभूमीत ते पिढ्यानूपिढ्या वास्तव्य करत आहेत आणि विविध व्यवसाय परंपरागत पद्धतीने करत आहेत त्या व्यवसायांना मान्यता देण्यात आलेली आहे. ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या बाबींचा अंर्तभाव करण्यात आलेला आहे.

जंगलात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या सदस्याला किंवा अन्य सदस्यामार्फत जीवन जगण्यासाठी स्वत: शेती करणे किंवा व्यक्ती म्हणून कोणताही सामान्य व्यवसाय करण्यासाठी वनभूमी ठेवण्याचा किंवा त्यामध्ये राहण्याचा अधिकार आहे.

पूर्वीच्या काळातील राजेशाही जमीनदारशाही किंवा त्यावेळी केंद्रात असलेल्या शासनानी निस्तार अथवा निस्तारासारखे दिलेले अधिकार उपभोगता येतील.

गौण वन उत्पादनाची उपलब्धता, त्याचा प्रत्यक्ष उपयोग तसेच ते प्राप्त करण्याचा अधिकार राहील. वनात प्रयोग करणे, मालकी बजावणे वनामध्ये स्थायिक किंवा हंगामानुसार जागा बदलून गुरे चारण्याचा, त्याचप्रमाणे परंपरागत हंगामी संसाधनावर अधिकार राहणार आहे.

आदिम जमाती तसेच कृषीपूर्व समुदायांना वनामध्ये राहण्याचा तसेच पर्यावरणाचा अधिकार राहील. जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या गरजा भागविण्यासाठी केवळ अधिकारांचा वापर करायचा आहे. केवळ व्यापारी उद्देशांसाठी करावयाचा नाही.

अनुसूचित जमातीच्या आदिवासी प्रत्येक एकत्र कुटुंबासाठी २.५ हेक्टर पेक्षा अधिक जमीन मिळणार नाही. जमीन वंशपरंपरेने देण्यात येऊ शकेल; पण तिचे हस्तांतरण करता येणार नाही.

वनाचे संरक्षण करणे. तसेच वनाचे पुनर्उत्पादन करणे (वृक्षांची लागवड करत ते जोपासणे) च्या जबाबदारीचा अंतर्भाव यात असणार आहे. जेथे जेथे वनभूमीवरील अधिकारांना मान्यता देण्यात येईल, तेथे तेथे पती आणि पत्नी दोघांचे नावे ती मंजूर करण्यात येईल.

परंपरागत तसेच प्रथेप्रमाणे चालत आलेल्या अधिकारांचा समावेश करावयाचा आहे.

असेही बंधन घालण्यात आले आहे की, जोपर्यंत आदिवासींच्या जमीनींवरील अधिकाराबाबत चौकशी पूर्ण करण्यात येणार नाही, तोपर्यंत त्या आदिवासीला त्यांच्या कब्जात असलेल्या जमीनीतून काढून टाकण्यात येणार नाही.

८.२ प्रस्तावीत कायद्याच्या प्रकरण ३ च्या खंड ५ मध्ये अधिकार धारण करणाऱ्यांची कर्तव्ये नेमून दिली आहेत. त्यामध्ये अशा काही कर्तव्यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे की, ती जर त्यांनी केली तर वन्य जीवांवर तसेच जैविक विविधतेवर अनिष्ट परिणाम होईल.

८.३ ग्रामसभा, विभागीय स्तरावरील समि: जिल्हास्तरावरील समित्या, आदिवासी कल्याण अधिकारी तसेच शासकीय अधिकारी यांनी कोणकोणती कार्य या प्रस्तावीत विधेयकांचे अंमलबजावणीसाठी पार पाडावयाची आहेत हे प्रस्तावित कायद्याच्या प्रकरण ४ मध्ये नेमून दिलेले आहे.

८.४ कायद्यात अंर्तभूत केलेले अपराध:

प्रस्तावित कायद्याच्या प्रकरण ५ मध्ये कायद्यात नेमून दिलेल्या तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले तर करावयाच्या दंड योजनेची माहिती देण्यात आली आहे. तसेच या कायद्याच्या अंतर्गत अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या गुन्ह्याचे वर्णनही दिलेले आहे. प्रस्तावीत कायद्यात रु. ५०००/- पर्यंतच्या दंडासहीत ३० दिवसांची साधी कैद तसेच एकापेक्षा अधिक वेळा गुन्हा/अपराध करणाऱ्यांचे वनातील हक्क खारीज/समाप्त करण्यांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

८.५ नोडल एजन्सी : आदिवासी कार्य मंत्रालयानी किंवा केंद्रीय सरकारमार्फत अधिकार दिलेला अधिकारी हा नोडल प्राधिकरण राहील. या कायद्याच्या अंमलबजावणीस तो जबाबदार राहील.

## ९. नियंत्रण आणि संतुलन

या प्रस्तावित विधेयकात वन आणि पर्यावरण मंत्रालयाच्या प्रचलित कायदा/नीती पेक्षा

जास्त नियंत्रण आणि संतुलन राखण्याची खास तरतूद करण्यात आली आहे.

जंगलात राहणाऱ्यांच्या अनुसूचित जमातींच्या (आदिवासी) लोकांच्या वनावरील अधिकारांना मान्यता देण्यात आलेली आहे. देशातील सर्व ८.२% आदिवासी लोकसंख्येला यामध्ये मील करुन घेण्यात आलेले नाही. त्या सर्वांना जमिनीचे वितरण मुळीच करण्यात येणार नाही. जंगलात राहणाऱ्या आदिवासींनाच केवळ लाभ देण्यात येणार आहे. जंगलाबाहेरील/अन्य राज्यातील आदिवासींना कोणताही लाभ देण्यात येणार नाही. वास्तविकरित्या या कायद्यानुसार जो जेथे राहतो, या आधारावर केवळ आदिवासी जनतेला लाभ देण्यात येईल. मात्र, पिढ्यान्पिढ्या वनभूमीवर कब्जा असणाऱ्यांच्या अधिकारांना मान्यता देण्यात येईल, की जेणेकरुन त्यांना दररोज कर्मचाऱ्यांना त्रास दिला जाणार नाही.

ठरवून देण्यात आलेल्या तारखेपूर्वीच्या कब्जांनाच मान्यता देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त २.५ हेक्टर क्षेत्राला ही मान्यता दिली जाणार आहे की, ज्यामुळे आदिवासी समाजातील संपन्न लोकांनाही जास्त वनजीवन बळकावण्यात टकाव करता येईल. वन आणि पर्यावरण मंत्रालयाने ठरवून दिलेल्या आदेशामध्ये जमीन धारण करण्याची अधिकतम सीमा ठरवून देण्यात आलेली नाही.

सर्व अधिकार वंशपरंपरागत राहणार आहेत. त्याचे संक्रमण करता येणार नाहीत तसेच ते हस्तांतरणीय असणार नाहीत.

जीवन जगून राहाणे, हा हेतू साध्य करणे यापर्यंत हे अधिकार मर्यादित राहणार आहेत.

कोणत्याही प्रकारच्या व्यापारी उपयोगास खास करत मनाई करण्यात आलेली आहे.

कायद्याच्या प्रस्तावात २५ ऑक्टोबर १९८० या निर्णायक तारखेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. वास्तविकरित्या वन जमिनीवरील कब्जाला मान्यता देण्याच्या एकमेव उद्देशाने, त्याचप्रमाणे वनातील अतिक्रमणाच्या प्रश्नाचा एकदाचा पुरता सोक्ष मोक्ष लावण्यासाठी उचलेले हे एकमेव पाऊल आहे.

अशीही तजवीज करण्यात आली आहे की, वनामध्ये अधिकार प्राप्त झालेली व्यक्ती क्षेत्रात जैविक विविधतेला, वनाला हानी पोहोचवणाऱ्या कृत्यात सामील होणार नाही.

अशी खास तरतूद करण्यात आली आहे की, जर कोणताही गुन्हा/अपराध पुन्हा पुन्हा केला तर त्याबद्दल दंड देण्याची तजवीज करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अशा गुन्हेगार व्यक्तीला वनामध्ये देण्यात आलेले अधिकार काढून घेण्याचीही तजवीज करण्यात आली आहे.

वनामधील सर्व स्तरावरील अधिकार देण्याचे परिरक्षण आणि मान्यता देण्याच्या प्रक्रियेमध्ये केंद्र सरकारच्या वन आणि पर्यावरण मंत्रालयाची भूमिका राहणार आहे. ज्याचा नियमावलीत खास करुन उल्लेख करण्यात येईल. वास्तविकपणे वनातील भूमीचे अधिकार देण्यात आल्यानंतर जनजातीतील कार्य मंत्रालयाची भूमिका समाप्त होणार आहे.

वनजमीनीचे कृषी भूमीत रुपांतर करुन याच्या हेतुने काही प्रयत्न या कायद्याने करण्यात येत नाही. या तत्वाचे आधारे अधिकार सोपविण्याचे कार्य करण्यात येणार आहे. अर्थातच वन साफ करण्यास किंवा/आणि वृक्ष छाटण्यासाठी परवानगी या कायद्याने देण्यात येणार नाही. ■■

# आदिवासी आणि जंगलवासियांचे हक्क

## प्रस्तावित कायदा-प्रकरण दोन

**कलम ३**

पोटकलम एक

वन कायद्यामध्ये नेमून दिलेल्या पुन:र्प्रस्थापनाच्या प्रक्रियाचे पालनही न करीता गृहीत राखीव जंगलातील क्षेत्रावरील मालकी हक्क खालील बाबींबाबत प्रदान करण्यात येतील.

१. आदिवासी क्षेत्र किंवा ग्रामीण किंवा गरीब विभागांवर परिणाम करणारे बिगर आदिवासी क्षेत्र.
२. वादाची जमीन कब्जात असणारे दावेदार (क्लेमंट)
३. गृहीत राखीव जंगल जाहीर करणारा प्रसिद्ध करण्याच्या वेळी ज्या दावेदारांकडे दाव्याच्या जमिनीचा कब्जा होता

पोटकलम दोन

भारतीय वन कायदा १९२७ चे कलम २० (अथवा अन्य संबंधित कायद्याचे त्यासमान कलम) खाली पुन:र्प्रस्थापनेची तरतूद पूर्ण होऊन जाहिरनामा प्रसिद्ध होणेचे वेळी अधिकार प्रदान करण्याचा लेखा तयार करण्यात आला असेल, परंतु कायद्याने नेमून दिलेल्या पद्धतीप्रमाणे वनजमिनीवरील हक्क निश्चिती करण्याची प्रक्रिया अपुरी ठेवली असेल किंवा चुकीचे दस्तवेज/नकाशे किंवा बाधीत व्यक्तींचा पुरावा अपुरेपणाने घेण्यात आलेला असेल तर मात्र-

अ) जर दावेदार यांच्या कब्जात जमीन असेल

ब) भारतीय वन कायदा १९२७ कलम ४ किंवा कलम २९ नुसार राखीव जंगल अथवा अन्य संबंधीत कायद्याखाली जाहिरनामा प्रसिद्ध करण्याच्या वेळी जर दावेदार यांचा जमिनीवर कब्जा असेल

पोटकलम तीन

भारतीय वन कायदा १९२७ चे कलम २० नुसार पुन:र्प्रस्थापनाची प्रक्रिया पुरी करण्यात आली असूनही; परंतु कलम २० खालील जाहिरनामा अद्याप काढण्यात आलेला नाही किंवा पुन:र्प्रस्थापनाची प्रक्रिया करण्यात येऊनही कलम २० खालील जाहिरनामा काढण्यात अवाजवी विलंब करण्यात आला असेल अशा बाबतीत-

अ) तथापि दावेदार यांच्याकडे अजूनही जमीन कब्जा असेल आणि

ब) भारतीय वन कायदा १९२७ किंवा तत्सम अन्य कायद्यानुसार कलम ४ खाली वन जमीन ही संरक्षित वन किंवा राखीव वन जाहीर करण्याचा इरादा जाहीर करणाऱ्या कलम ४ प्रमाणे जाहिरनामा प्रसिद्ध करणेचे वेळी जर दावेदार यांचेकडे जमिनीचा कब्जा असेल.

पोटकलम चार

हेतुत: किंवा चुकून किंवा नजरचुकीने जरी कोणत्याही वर्णनाचे किंवा परिभाषेतील जरी मंजुरीने/भाडेपट्ट्याने जमिनीवर हक्क देण्यात आला असेल.

परंतु हक्क प्रदान केलेल्या व्यक्तीकडे जमीन कब्जा असेल; परंतु पट्टा/भाडेपट्टा वगैरे दिलेला असूनही त्या व्यक्तीला जमिनीतून हुसकावून लावला असल्याचे ती सिद्ध करेल.

पोटकलम पाच

अनुसूचित जमाती किंवा ग्रामीण गरीब यांना

व्यक्तीश: किंवा सामुदायिकरित्या जर सरकारी खात्याकडून जमिनीचा कोणत्याही वर्णनाचा किंवा परिभाषेतील पट्टा भाडेपट्टा/मंजुरी प्रदान केलेली असेल आणि जर सरकारी खात्यांच्या अंतर्गत वादामुळे जर अशा पट्टेधारकांचे हक्कांना जर बाधा पोहोचत असेल तर बाधीतांना हक्क प्रदान करण्यात येतील.

१. तथापि या अशा हक्कदाराला सिद्ध करावे लागेल की, त्यांचेकडे त्या जमिनींचा कब्जा सातत्याने आहे किंवा त्या व्यक्तीला असे सप्रमाण सिद्ध करावे लागेल की, त्याच्याकडे जमिनीचा पट्टा/भाडेपट्टा वगैरे असूनही त्याला/त्यांना जबरदस्तीने उपायांचा अवलंबन करत जमिनीतून हुसकावून लावण्यात आले आहे.

पोटकलम सहा

वन शेती, वृक्ष लागवड किंवा अन्य कारणासाठी २५ ऑक्टोबर १९८० पूर्वी भाडेपट्टा/पट्टा स्वरूपातील किंवा अन्य परिभाषेतील वन जमिनीवरील हक्क आदिवासी जमातींच्या किंवा अन्य ग्रामीण गरीबांना दिलेले असतील. तथापि वन संरक्षण कायदा १९८० झाल्यामुळे राज्य सरकार आणि केंद्र शासित प्रदेशांना त्यांचे नूतनीकरण करता येत नसेल त्या सर्वांना हक्क प्रदान करण्यात येत आहेत.

पोटकलम सात

सर्व वनवर्गातून वनातील जुन्या वस्त्यांमधील जमिनीवर आणि घराखालील जागांवर हक्क प्रदान करण्यात येतील त्याचप्रमाणे ही सर्व वनगांवे आणि जुन्या वस्त्यांचे महसुली गावात रुपांतरण करण्यात येईल. या अशा महसुली गांवातून शाळा, आरोग्य केंद्र, पटांगण, सार्वजनिक वगैरे अत्यावश्यक समाज कल्याण कार्यासाठी जमिनी राखून ठेवण्यात येतील.

अ) परंतु अशी वनगावे किंवा वनवस्त्या १९८० पूर्वीपासून अस्तित्त्वात होती. तसेच अशांना हे देखिल सिद्ध करावे लागले की कायद्यानी नेमून दिलेल्या कार्यपद्धतीचे अवलंबन न करता त्यांना त्यांच्या वस्त्यांमधून हुसकावून लावलेले आहे, किंवा १९८० नंतरही संबंधित वनखात्यांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या तेथील निवासांना (वस्त्यांना) मुभा दिलेली आहे. हरकत घेतलेली नाही.

ब) विकास प्रकल्पामुळे स्थलांतरीत झालेले आदिवासी १९८० नंतरच्या वास्तव्य करत असलेल्या किंवा त्याही पूर्वीच्या अस्तित्त्वात असलेल्या वनवस्त्यांना वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी मुभा दिलेली असेल आणि अशा वस्त्यांतून मूळच्या रहिवाशांचे वारसदार वस्ती करुन असतील व त्यांचा या वस्त्यांतील घरांच्या जागांवर/जमिनीवर सातत्याने कब्जा वहिवाट असेल तर त्या वस्त्यांतून राहण्यासाठी वन अधिकाऱ्यांनी मान्यता दिली होती हे तपासणीमध्ये त्यांना सिद्ध करावे लागणार आहे.

पोटकलम आठ

राज्य सरकारे/केंद्र शासीत प्रदेशांनी आदिवासी आणि ग्रामीण गरीबांना त्यांच्या कब्जात असलेल्या अतिक्रमण केलेल्या जमिनींवरील घरठाणांच्या जागांवरील ही अतिक्रमणे नियमानुकूल करुन त्या जागा त्यांना मंजूर करण्याचे आदेश देण्यात आले असतील तर ते आदेश खालीलप्रमाणे पूर्तता केली तर ते अंमलात येणार आहेत.

अ) १९८० पूर्वीपासून कब्जा आणि कसवणूक असली पाहिजे.

ब) जमीन हक्कदार किंवा त्यांचे वारसाचा त्यांचेकडील जमिनीवर किंवा राहत्या घरठाणावर सातत्याने अप्रतिहत कब्जा वहिवाट आहे किंवा त्यांना १९८० नंतर किंवा तत्पूर्वी त्यांच्या जा जागेतून कायद्यांनी ठरवून दिलेली कार्यपद्धती न अवलंबता जबरदस्तीने हुसकावून लावण्यात आले आहे.

क) कमाल धारणा क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र अशा कब्जातील किंवा कसवणुकीखालील क्षेत्र असता कामा नये.

पोटकलम नऊ

कृषी पूर्व प्रिमिटीव्ह (आदिम) आदिवासी जमाती आणि फेरपड पद्धतीने शेती करणाऱ्यांना त्यांच्या पिढीजात जमिनीवरील अतिक्रमणदार मानण्यात येणार नाही. त्यांचे मालमत्तेवरील (जमिनीवरील वगैरे) सामुदायिक हक्कांना मान्यता देण्यात येईल. फेरपड पद्धतीने करण्यात येणारे जमिनीचे वन जमीन म्हणून वर्गीकरण न करता पडीत वनजमीन ही एफ.ए.ओ.च्या वर्गिकरणाच्या पद्धतीला मान्यता देण्यात येत आहे.

पेसा (पी.इ.एस.अे.) कायद्याच्या कलम ४ च्या तरतुदीनुसार संबंधित ग्रामसभेनी या अशा वन जमिनींच्या व्यवस्थापनाबद्दलची पद्धती निश्चित करावयाची आहे. परंतु ग्रामसभेनी हे करण्यासाठी संबंधित समाज घटकांच्या जीवनशैलीचा पर्यावरण संरक्षणासाठी ते अवलंबत असलेल्या कार्यपद्धतीचा विचार करून त्यांचाही सल्ला घ्यावयाचा आहे.

पोटकलम दहा

या कायद्याच्या वरील पोटकलम एक ते पोटकलम ९ च्या तरतुदीनुसार ज्या आदिवासी आणि ग्रामीण गरीब कुटुंबे पुनर्वसनास पात्र असणार नाहीत त्यांचे देखील पुनर्वसन करायचे आहे. ग्रामसभेमार्फत संचलित केल्या जाणाऱ्या समाज व्यवस्थापनाखालील वन संरक्षण कार्यक्रम अंतर्गत भारतीय वन कायद्याखालील कलम २८ नुसार ठरविलेल्या निकृष्ट गाववन जमिनी आणि गावातील पडीत जमिनी ग्रामसभेकडे सुपूर्द असणार आहेत. त्या जमिनीचा वापर अशा वरील कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी करावयाचा आहे. अशा जमिनींचे भूखंड पाडून त्यावर या कुटुंबाकडून वनशेती करुन घ्यावयाची आहे. तसेच त्याचवेळी गांवातील वनजमिनींचे संरक्षणही त्यांच्याकडून करुन घ्यायचे आहे.

पोटकलम अकरा

पी. इ. एस. एस. (पेसा) कायद्याच्या कलम ४ नुसार भारतीय वन कायदा १९२७ चे कलम २८ खालील निकृष्ट वन जमिनी हिरव्याच्छादित (वृक्षाच्छादित) करण्यासाठी ग्रामसभेच्या स्वाधीन करावयाच्या आहेत. या जमिनी वर पोटकलम दहामध्ये नमूद केल्याप्रमाणे गावातील पुनर्वसन झालेल्या कुटुंबांकडे वनशेती करून हिरव्यागार करण्यासाठी वाटून द्यावयाच्या आहेत. परंतु या अशा निकृष्ठ वन जमिनीतून वनशेती करण्यासाठी योग्य ती स्थानिक (इंडीयन) पद्धती शोधून काढून ती विकसित करण्यासाठी आदिवासी कल्याण खात्याने सी.बी.ओ. तसेच एन.जी.ओज् चे सहाय्य प्राप्त करायचे आहे.

पोटकलम बारा

गौण वन उत्पादने, गुरे चारणे, जळणासाठी लागणारा लाकूडफटा पाणी, मासेमारी आणि वनातील इतर उद्योग यावरील हक्क आदिवासी व जंगलवासियांनी वंशपरंपरेनी उपभोगले आहे, ते त्यांना प्रदान करण्यात येतील. ■■

# आदिवासी कायद्यांची मुदत वाढवलीच पाहिजे !

भारतात ८ कोटी ७८ लाख आदिवासी आहेत. जगातल्या इतर देशांप्रमाणेच आदिवासींकडील जमिनी लुबाडून त्यांना भूमिहीन करण्याची प्रक्रिया भारतातही शतकानुशतके राहिलेली आहे.

१९४७ मध्ये परक्या ब्रिटीश अमलातून भारत स्वतंत्र झाला. नवीन राज्य घटना स्वीकारण्यात आली. या घटनेतील तरतुदीप्रमाणे आदिवासी दलित या मागासवर्गीयांच्या हितरक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारली. घटनेच्या कलम ४६ नुसार राज्याची दुर्बलेत्तर जमातवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करुन सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करायचे आहे.

घटनेतील या तरतुदी आणि मूलभूत हक्क प्रदान करणाऱ्या अन्य तरतुदींचे पालन करण्यासाठी अनेकविध कायदे करण्यात आले. विशेषत: कुळकायदा, कमाल जमीन धारणा कायदा वगैरे जमीन सुधारणा कायदे करण्यात आले. कसेल त्याची जमीन या तत्वावर आधारित कुळकायदयात मुलभूत सुधारणा १९५६ मध्ये करण्यात आली आणि १ एप्रिल १९५७ रोजीची कुळे त्यांच्या कुळहक्कांच्या जमिनींची गृहीत खरेदीदार झाली.

जमीन सुधारणा कायद्यामुळे, विशेषत कुळकायद्यामुळे आदिवासींकडील, बिगर आदिवासींकडे होणाऱ्या जमीन हस्तांतरणाला पायबंद बसेल असे वाटले होते; पण प्रत्यक्षात तसे अनुभवाला आले. काही आदिवासींकडील जमिनींचे हस्तांतरण उलट अधिक वेगाने होत असल्याचे, महाराष्ट्रात सर्वत्र अनुभवाला आले.

जमीन महसूल संहिता, कुळ कायदे, सुधारणा एकत्रिकरण कायदा वगैरे तरतुदींमुळे आदिवासी भूधारक आणि जमीन कसणारे यांना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते, त्याबद्दल परीक्षण करुन त्यांच्या हितसंबंधाचे चांगल्या प्रकारे संरक्षण व्हावे म्हणून शिफारशी करण्यासाठी श्री. ह. गो. वर्तक, महसूल मंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती महाराष्ट्र सरकारने १९७६ मध्ये स्थापन केली. वर्तक समितीने आपला अहवाल शिफारशींसह ७ एप्रिल १९७२ रोजी शासनाकडे सादर केला.

वर्तक समितीच्या शिफारशींनुसार ६ जुलै १९७४ ला सरकारने वटहुकुम काढला. या वटहुकुमाचा उद्देश होता की -

अ) आदिवासींना त्यांच्या जमिनींबाबत संरक्षण प्राप्त व्हावे,

ब) आदिवासींच्या जमिनींबाबत आतापर्यंत झालेले बेकायदेशीर व्यवहार अवैध घोषित करावेत आणि

क) या हस्तांतरीत जमिनी संबधित आदिवासींना किंवा त्यांच्या वारसांना परत द्याव्यात.

या वटहुकुमाचे रुपांतर पुढे महाराष्ट्र जमीन महसूल आणि कुळवहिवाट कायदे (सुधारणा)

कायदा १९७४ या कालावधीत झालेल्या आदिवासींच्या जमीन हस्तांतरणाचा प्रश्न कायम राहिला. तो सोडविण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला. महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन पुन:र्प्रस्थापित करण्यासाठीचा कायदा १९७५ (कायदा क्र. १४/१९७५) करण्यात आला. राष्ट्रपतींनी या कायद्याला २८ एप्रिल १९७५ ला मान्यता दिली. हा कायदा १ नोव्हेंबर १९७५ पासून अंमलात आला आहे. या कायद्याची विधीग्राह्यता मात्र सर्वोच्च न्यायालयाची दिवाणी अपिल क्र. ४३८४/८४ दिनांक ४ डिसेंबर १९८४ च्या निर्णयाने मान्य केली आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

आदिवासी कायदा क्रमांक ३५/१९७४ चे कलम ३६-अ पोटकलम (४) नुसार हा कायदा अंमलात आल्यापासून तीन वर्षांचे आत आदिवासींना त्यांची हस्तांतरीत झालेली जमीन पुन्हा परत मिळावी म्हणून अर्ज करता येत होता. सन १९९१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ ने ही मुदत ३० वर्षे करण्यात आली. हा कायदा ६ जुलै १९७४ रोजी अंमलात आला आहे. तेव्हा ३० वर्षांची मुदत ५ जुलै २००४ रोजी संपलेली आहे. याचा अर्थ हा कायदा ६ जुलै २००४ पासून अंमलात राहिलेला नाही. तेव्हा बाधीत आदिवासींनी त्यांची हस्तांतरीत जमीन परत मिळावी म्हणून अर्ज ६ जुलै २००४ नंतर कायद्याने करता येत नाही.

आदिवासी कायदा क्रमांक १४/१९७५ चे कलम ३ पोटकलम (१) नुसार जमीन हस्तांतरण झालेल्या आदिवासीला हा कायदा अंमलात आल्यापासून ३ वर्षाचे आत जमीन परत मिळावी म्हणून अर्ज करता येत होता. ३ वर्षांची मुदत १९९१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ प्रमाणे ३० वर्षे करण्यात आली, ही मुदत संपलेली आहे. याचा अर्थ या कायद्याखाली १ नोव्हेंबर २००५ नंतर बाधीत आदिवासीला जमीन परत मिळवण्यासाठी अर्ज करता येणार नाही, असा होतो. थोडक्यात आदिवासींना न्याय देणारे, त्यांच्या बिगर आदिवासींनी अन्याय अत्याचार करुन बेकायदेशीरपणे बळकावलेल्या जमिनी त्यांना पुन:प्रस्थापित करणारे दोन्हीही कायदे (कायदा क्रमांक ३५/१९७४ आणि कायदा क्रमांक १४/१९७५) मुदत संपल्याने आता अंमलात राहिलेले नाहीत, ही दुर्दैवी पण भयानक वस्तुस्थिती नजरेआड करता येणार नाही.

वर्तक समितीने हे दोन्ही कायदे ज्या परिस्थितीत करण्याची शिफारस केलेली होती ती तशीच आहे. या दोन्ही कायद्यांचा हेतू पूर्णत: साध्य झालेला नाही. अजूनही बेकायदेशीर/कायदेशीर आदिवासींच्या जमीन हस्तांतरणाची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर ठिकठिकाणी उघडकीस येत आहेत. तेव्हा जोपर्यंत भारतीय राज्यघटनेत आदिवासींसाठी खास तरतुदी आहेत, तोपर्यंत हे कायदे अंमलात राहावेत अशी सुधारणा या कायद्यात करण्यात आली पाहिजे. आदिवासींकडील जमीन बिगर आदिवासींनी हिसकावून घेण्याच्या प्रक्रियेला प्रतिबंध करण्यासाठी हे करणे अत्यंत आवश्यक आहे.

हे दोन कायदे अंमलात आल्यानंतर २ फेब्रुवारी १९७२ पर्यंत या कायद्यांच्या अंमलबजावणीबाबतचा एक अहवाल सचिव आणि आयुक्त आदिवासी कल्याण, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे यांनी १९७९ मध्ये प्रसिध्द केला आहे. त्यातील अंमलबजावणीचा आढावा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | महाराष्ट्र कायदा क्र. ३५/१९७४ | महाराष्ट्र कायदा क्र. १४/१९७५ |
|---|---|---|---|
| १. | सक्षम अधिकाऱ्याकडे नोंदलेली प्रकरण | १४,७७० | ३१,४०४ |
| २. | प्राथमिक चौकशीनंतर जमीन पुन:प्रस्थापित करण्यात पात्र आढळून आलेली प्रकरणे | १४,२०१ | -- |
| ३. | तपशीलवार चौकशीनंतर रद्द झालेली प्रकरणे | ७,९३४ | १४,३७७ |
| ४. | जमीन पुन्हा प्रस्थापित करण्याचा हुकुम झालेली | ६,२६४ | ९,४३७ |
| ५. | प्रत्यक्ष जमीन कब्जा देण्यात आला | ४,८९५ | ६,४०४ |

दोन्ही कायदे अंमलात आल्यानंतर ५ वर्षांचे कालावधीतील हा अहवाल आहे. वरील आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की, स्थगिती आदेश आणि अन्य कारणांमुळे या कायद्याची अंमलबजावणी समाधानकारक झालेली नसल्याचा निष्कर्ष या अहवालात काढलेला आहे. त्याची तीन प्रमुख कारणे नमूद केलेली आहेत.

१. कायद्यामधील त्रुटी

२. आदिवासींमधील अज्ञान

३. जमीन प्रस्थापित करण्यासाठी पार पाडावी लागणारी गुंतागुंतीची प्रक्रिया

आदिवासी पट्ट्यामध्ये विशेषत: ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, भंडारा, चंद्रपूर मधून आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या छोट्या मोठ्या संघटना आहेत. या संघटनांमधून कार्यकर्त्यांचे म्हणणे असे आहे की, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा हेतू अंशत: जरी साध्य करायचा असेल तर शासनाने खालील कारवाई करणे आवश्यक आहे.

१. आदिवासी जमिनींच्या सर्व रद्द केलेल्या (२९००१ म्हणजे ६४%) प्रकरणामध्ये पुन्हा छाननी म्हणजे पुन:रीक्षण करण्यात यावे. अनाधिकाराने औचित्यभंग करुन रद्द केलेल्या प्रकरणात फेरचौकशी करुन आदिवासींना न्याय द्यावा.

२. औद्योगिकरणामुळे आणि शहरीकरणामुळे आदिवासींच्या शेतजमिनींच्या उपयोगात बदल होतो, त्यांची जमीन हस्तांतरीत होते. आदिवासींची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. तेव्हा विकसित होणाऱ्या या भागातील आदिवासींच्या जमिनींची एक गंगाजळी निर्माण करावी, प्रचलित चालू बाजारभावाने या जमिनी विकून खर्च वजा करुन राहिलेली सर्व रक्कम संबंधित आदिवासीला देऊन त्याचे कायमस्वरुपी पुन:र्प्रस्थापन करावे.

३. कोणत्याही प्रकल्पासाठी, सार्वजनिक उपयोगासाठी आदिवासींची जमीन राज्य अथवा केंद्र सरकारने संपादन केल्यास या संपादित जमिनींच्या मोबदल्यात संपादित केलेल्या जमिनीच्या प्रतीची सिंचीत जमीन देण्यात यावी. आदिवासींना कोणत्याही परिस्थितीत भूमीहीन करण्यात येऊ नये.

हे दोन्ही कायदे अंमलात येऊन ३० वर्षे झाली आहेत. या कायद्यांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्याची निश्चितच आवश्यकता आहे.

या दोनही कायद्यांचा उद्देश कितपत सफल झाला हे देखिल या मूल्यांकनाने सुस्पष्ट होईल तज्ञांच्या समितीमार्फत या कायद्याच्या

अंमलबजावणीचा तपशीलवार आढावा घेऊन तो प्रसिद्ध केला तर ते सर्वार्थाने उपयुक्त ठरेल. तसेच या दोनही कायद्यांची मुदत वाढविण्याच्या निर्णयाचे समर्थन देखील हा अहवाल निश्चितच करेल.

महाराष्ट्र राज्याप्रमाणे आदिवासींकडील जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध घालण्यासाठी आणि आदिवासींच्या जमिनी त्यांचेकडे पुन:प्रस्थापित करण्यासाठी आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात, ओरिसा, पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा, हिमाचल प्रदेश, मेघालय या अन्य राज्यातून कायदे झालेले आहेत.

या राज्यातील कायद्याचा तुलनात्मक अभ्यास केला तर असे दिसून येते की, बिहार, ओरिसा, राजस्थान, आंध्रप्रदेश, राज्यातील कायदे महाराष्ट्रातील कायद्यापेक्षा अधिक पुरोगामी आणि कायद्याचा मूळ हेतू साध्य करणारे आहेत तेव्हा महाराष्ट्रातील आदिवासी कायदे (कायदा क्रमांक ३५/७४ आणि कायदा क्रमांक १४/१९७५) मध्ये आदिवासींनी अर्ज दाखल करण्याच्या ३० वर्षांची मुदत वाढविण्यासाठी जी सुधारणा करण्यात येईल, त्याचवेळी या आदिवासी कायद्यांमध्ये खालील पुरोगामी तरतुदींचा समावेश करणे योग्य ठरणार आहे. कारण त्यामुळे हे कायदे अधिक परिणामकारक आणि उद्देशपूर्ती करणारे होतील.

१. महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्रात आंध्रप्रदेशप्रमाणे आदिवासींना आदिवासी व्यतिरिक्त अन्य व्यक्तीला त्यांची जमीन विकता येणार नाही.

२. आदिवासीच्या बिगर आदिवासीला झालेल्या जमीन हस्तांतरणाची नोंदच गावच्या भूमि अभिलेखात, नोंदणी अधिकाऱ्याकडे राजस्थान व ओरिसाप्रमाणे करता कामा नये.

३. बिहार राज्याप्रमाणे आदिवासी जमिनींबाबत किंवा स्थावर मिळकतीच्या कोणत्याही दाव्यात डेप्युटी कमिशनर म्हणजे महाराष्ट्रात जिल्हाधिकारी यांना पक्षकार करण्याचे बंधन घालण्यात यावे.

४. ओरिसा व बिहार राज्यातून बेकायदेशीर जमीन हस्तांतरण करणारे किंवा आदिवासींला त्यांच्या जमीनीतून हुसकावणारी व्यक्ती गुन्हेगार असल्याने ती कारावास किंवा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरविण्यात आली आहे. तरी तरतूद कायद्यातून करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य पुरोगामी असल्याचा सार्थ अभियान काँग्रेस सत्ताधिकाऱ्यांना आहे. कारण जमीन सुधारणा कायदे मंजूर करुन ते अंमलात आणण्यामागे महाराष्ट्राने नेहमी पुढाकार घेतलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. परंतु आदिवासींच्या बिगर आदिवासीकडे हस्तांतरीत झालेल्या जमीनींबाबत महाराष्ट्र राज्यात करण्यात आलेल्या कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत मात्र महाराष्ट्र शासन उदासीन आणि निरूत्साही असल्याचे अनुभवास आले आहे.

आदिवासी कायदा १४/१९७५, २८ मे १९७५ रोजी राज्यपत्रात प्रसिद्ध झाला, तो १ नोव्हेंबर १९७५ पासून अंमलात आला. या कायद्याची अंमलबजावणी होऊ नये म्हणून कित्येक याचिका मुंबई उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या. जवळ जवळ १० वर्षांनी म्हणजे ४ डिसेंबर १९८४ रोजी हा कायदा सर्वोच्च न्यायालयात दाखल झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती चिनप्पा रेड्डी यांच्या तीन सदस्यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला (ए.वाय.आर. मार्च १९८५ खंड ७२ भाग ८५५ पान क्र. ३८९ ते ४०४). सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अतिशय पुरोगामी आणि सामजिक

( पृष्ठ २६ वर पहा)

# आदिवासी विकास धोरण - एक उपेक्षित प्रश्न

## शरद कुलकर्णी

आदिवासी विकास धोरणासंबंधी व त्यातील समाविष्ट मुद्दयासंबंधी सविस्तर लेख 'हाकारा' च्या जुलै-डिसेंबर २००४ चा अंकात प्रसिद्ध झाला. मात्र या धोरणात 'आदिवासी म्हणजे नक्की कोण' या प्रश्नाचा ऊहापोह नाही. वास्तविक पाहता, आदिवासींच्या दृष्टीने हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. आदिवासी जमातींच्या नावाशी साम्य असलेल्या काही जाती समाजात आहेत, उदाहरणार्थ-हळबा/हळबी आणि हळबा कोष्टी, महादेव कोळी आणि इतर मच्छिमार कोळी, तसेच धनगड आणि धनगर.

१९८१ च्या जनगणनेत या व यांसारख्या इतर जातीच्या अनेक कुटुंबांनी आपली नोंद आदिवासी जमात म्हणून करुन घेतली. त्यामुळे १९७१ ते ७९ या काळात आदिवासींच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ झालेली दिसून येते. अशा चुकीच्या नोंदी नंतरच्या जनगणनेतही चालू राहिल्या.

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या ८५.७७ लाख आहे. यातील किमान १० लाख व्यक्ती तरी अशाप्रकारे चुकीच्या नोंदी झालेल्या असाव्यात. एखादी व्यक्ती अनुसूचित जातीची आहे किंवा नाही याविषयीची प्रकरणे कोर्टात जातात. त्यावेळी या प्रश्नावर निकाल दिले जातात. मात्र यातील काही निकाल परस्पर विरोधी आहेत आणि हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झालेला आहे.

### राज्यघटना

घटनेत आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती म्हटले आहे. अनुसूचित जमाती कोण? हे अनुसूचित जमातीच्या यादीवरून ठरविले जाते. राज्यघटनेतील अनुच्छेद ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींनी अनुसूचित जमातींची सूची करावयाची आहे. त्यानंतर या सूचित संसदेला कायदा करूनच बदल करता येतील.

पहिली सूची जाहीर झाल्यानंतर त्यात बदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना किंवा राज्य सरकारांना नाही. घटनेच्या अनुच्छेद ३४२ अन्वये राष्ट्रपती आवश्यक तेथे राज्यपालांशी चर्चा करुन आदिवासी जमाती किंवा त्यांचा काही भाग किंवा आदिवासी जमातींच्या अंतर्गत काही समाजगट यांना भारतीय संविधानाच्या अंतर्गत अनुसूचित जमाती म्हणून अधिसूचना जाहीर करु शकतात. त्यानंतर या यादीत बदल करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे.

अशाप्रकारची पहिली सूची राष्ट्रपतींनी १९५० मध्ये जारी केली. त्यानंतर त्यात सुधारणा करुन दुसरी सूची १९५६ मध्ये तर तिसरी सूची १९७६ मध्ये जारी केली. १९५६ पर्यंतच्या सूचीत काही जमातींसाठी त्यांचे विभाग नमूद करण्यात आले होते. या जमातीच्या व्यक्तींची नोंद अनुसूचित जातीचे/जमातींचे म्हणून जाहीर केलेल्या विभागातच ती व्यक्ती राहात असेल तरच केली जात असे. उदाहरणार्थ, मल्हार कोळी या जमातीसाठी ठाणे

जिल्हा नमूद केला होता. वास्तविक या जिल्ह्याचा काही भाग रायगड व नासिक जिल्ह्याला लागून आहे. एखाद्या मल्हार कोळी कुटुंबातील व्यक्तीची नातेवाईक नजिकच्या रायगड किंवा नासिक जिल्ह्यात राहात असल्यास तिची नोंद अनुसूचित जातीत केली जात नसे. या बंधनास क्षेत्रिय बंधन म्हटले जाई आणि असे बंधन महाराष्ट्रात मल्हार कोळी, महादेव कोळी किंवा डोंगर कोळी आणि ठाकर/ठाकुर या जमातींसाठीही होते.

या क्षेत्रिय बंधनामुळे प्रत्यक्षात अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे १९७६ साली हे क्षेत्रिय बंधन उठविण्यात येऊन फक्त चोधरा आणि थोटी या अतिशय लहान जमातींसाठीच ठेवण्यात आले. याच काळात अनेक जातींच्या संघटनांनी आपल्या जातीचा समावेश अनुसूचित जातीत करावा अशा मागण्या मांडल्या व काही ठिकाणी तर आंदोलने केली. असा बदल होत नाही हे लक्षात आल्यावर या जमातीतील अनेक कुटुंबांनी चुकीची माहिती देऊन आपला समावेश आदिवासी जमातीत करुन घेतला.

चुकीची शिफारस पत्रे मिळवून अनेकांनी उच्च शिक्षण संस्थांत आरक्षित जागांवर दावा सांगून प्रवेश मिळविले. वास्तविक ही गोष्ट आरक्षणाच्या मूळ हेतूलाच बाधा आणणारी आहे. एखादा बिगर आदिवासी गट नावातील साम्याचा फायदा घेऊन जेव्हा अनुसूचित जमात म्हणून दावा करतात, त्यावेळी ते अनुसूचित जमातींना घटनेने बहाल केलेल्या संरक्षण व सवलतींप्रासून वंचित ठेवतात. अशा प्रकारची अनेक प्रकरणे न्यायालये समोर आली आहेत. यापैकी काही निकालांचा ऊहापोह करणे आवश्यक आहे.

## न्यायालयीन निर्णय

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर आदिवासी गोवारी समाज संघटन आणि कैलास रामजी राऊत या गोवारी जातीच्या इसमाने याचिका दाखल केली. अनुसूचित जमातीच्या यादीत गोंडांची गोंड-गोवारी नावाची जमात असल्याची नोंद आहे. त्यामुळे सर्व गोवारी जातीला गोंड-गोवारी असल्याचे जाहीर करावे अशी मागणी त्याने केली. त्यावर गोवारी आणि गोंड गोवारी वेगळे आहेत का, अशी चर्चा झाली. गोंडगोवारी हा जनावरांची राखण करणारा समूह आहे. काही विद्वानांच्या मते गोंड-गोवारी ही गोवारी आणि गोंड यांच्या संकटातून निर्माण झालेली संतती आहे.

न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. असेच एक प्रकरण माना समाजाच्या व्यक्तीच्या बाबतीत उपस्थित झाले. श्री. सुखदेवबाबू उईके यांनी ते क्षत्रिय बिडवाईक माना समाजाचे आहेत, हे मान्य केले. १९७६ सालच्या अनुसूचित जमातींच्या यादीत माना समाजाची गोंडांची उच्च जमात म्हणून समावेश झाला असल्यामुळे आपण अनुसूचित जमातीचे आहेत, तेव्हा आपल्याला त्याचे सदस्य म्हणून निवडणूक लढविण्याचे अधिकार आहेत असा दावा केला.

सर्वोच्च न्यायालयाने माना समाजाचा गोंडांची एक उपजमात म्हणून उल्लेख आहे. मात्र गोंडमाना समाजातील व्यक्तींचे गोंड जमातीशी साहचर्य (Affinity) असले पाहिजे. साहचर्य नसलेल्या समाजात केवळ त्या समाजाचे नाव उपजमाती सारखे आहे म्हणून त्या समाजाला अनुसूचित जमात म्हणता येणार नाही. जर एकाच नावाचे दोन समाज असतील आणि त्यातील एका

जमातीचे दुसऱ्या जमातीशी साहचर्य नसेल तर त्या समाजाचा यादीत स्वतंत्रपणे उल्लेख झाला असता. तो तसा नाही म्हणून माना समाजाला अनुसूचित जमात म्हणून मानता येणार नाही.

असेच एक प्रकरण मुंबई उच्च न्यायालयासमोर आले. अर्जदार सुचिता पाटील ही हिंदू-कोळी जातीची असूनही तिने महादेव कोळी या अनुसूचित जमातीची असल्याचे शिफारस पत्र मिळविले होते. त्याच्या आधारावर तिला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. तिची बहीण माधुरी पाटील हिने अशाच शिफारसपत्राच्या आधारावर दंतवैद्यक कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. जात पडताळणी समितीने हे शिफारस-पत्र मान्य केले नाही. आणि ती हिंदू कोळी जातीची आहे, असे नमूद केले. न्यायालयाने पडताळणी समितीचे म्हणणे ग्राह्य धरले. केवळ नामसादृश्याच्या जोरावर बिगर आदिवासी व्यक्तीला अनुसूचित जमातीचा असल्याचा दावा करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निकाल मान्य केला.

मात्र याहून काही वेगळे निकाल अलिकडे न्यायालयाने दिले आहेत. त्यातील एक निकाल अनुसूचित जातींच्या संदर्भात आहे.

केरळमध्ये लक्ष्मीकुट्टी हिने थंदन म्हणून अनुसूचित जातीची असल्याचा दावा केला. केरळमधील अनुसूचित जमातीच्या यादीत थंदन नावाची जात आहे. मात्र थंदन ही इझवा किंवा ठिमा या यादीत नसलेल्या जातीची एक पोटजात आहे. केरळ सरकारने तपास करुन लक्ष्मी कुट्टी ही इझवा जातीची थंदन पोट जमातीची आहे, त्यामुळे तिला अनुसूचित जातीचे मानता येणार नाही, असा निर्णय दिला. याविरूद्ध झालेल्या अपिलात कोर्टाने लक्ष्मी कुट्टी ही थंदन या अनुसूचित नसलेल्या इझवा जमातीची पोटजात आहे असे मानले तरी थंदन हे नाव अनुसूचित जातीच्या यादीत असल्यामुळे ते मान्य करावे लागेल. यादी करणाऱ्याच्या मनात त्यावेळी नक्की काय होते याचे अनुमान करता येणार नाही.

अनुसूचित जातीच्या यादीत असलेल्या जातींची चिकित्सा करुन एखादी व्यक्ती अनुसूचित जातीची आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार राज्यसरकार अथवा न्यायालयाला नाही.

याच निकालावर आधारलेला एक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला.

बी.टी. वाघ यांनी ठाकूर असल्यामुळे आपण अनुसूचित जमातीचे आहेत, असा दावा केला. प्रमाणपत्र पडताळणी समितीने वाघ हे अनुसूचित जमातीच्या ठाकूर जमातीने नसून हिंदूमधील ठाकूर जातीचे आहे, असे सांगून त्यांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नाकारले होते. उच्च न्यायालयाने पडताळणी समिती ठाकूरांचे दोन गटात वर्गीकरण करीत असून एक गट अनुसूचित जमातीचा आहे, तर दुसरा नाही असे प्रतिपादन केले. हे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाच्या लक्ष्मी कुट्टी निवाड्याच्या विरूद्ध आहे आणि त्यामुळे ते वैध नाही असा निर्णय दिला. पडताळणी समितीला एखादी व्यक्ती अनुसूचित जातीची किंवा जमातीची आहे याविषयी पुरावा मागता येतो. मात्र त्या जातीचे किंवा जमातीचे नाव प्रचलित यादीत असल्यास त्या नावाची दुसरी जमात आहे किंवा नाही आणि कोणतीही व्यक्ती अनुसूचित जमातींची आहे किंवा नाही हे ठरवू शकत नाही.

हे सर्व निकाल घटनेत अनुसूचित जमात याची व्याख्या न केल्यामुळे दिले गेले आहेत, अशी व्याख्या घटनेत नाही आणि न्यायालयानेही केलेली नाही. न्यायालयापुढील अनेक प्रकरणात अनुसूचित जातीच्या वैशिष्ठयासंबंधी चर्चा आहे. परंतु निश्चित निकाल नाही. वास्तविक पाहता, घटनेत राष्ट्रपतींना कोणती जमात किंवा जमातीचा भाग अनुसूचित जमातीत हक्क आहे. मात्र जमात नसलेल्या समाज गटाला अशा यादीत टाकणे गैर होईल. असा अधिकार राष्ट्रपतींना आणि संसदेला नाही. मात्र यासाठी जमात (Tribe) या संज्ञेची स्पष्ट व्याख्या केली पाहिजे.

आदिवासी मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या आदिवासी धोरणाच्या मसुद्यात याचा उल्लेख नाही. हा एक महत्त्वाचा प्रश्न मसुद्यात उपेक्षित राहिलेला आहे. ■■

निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

१. प्रकाशन स्थळ : ६४, आनंद पार्क, पुणे - ४११ ००७.

२. प्रकाशन काळ : त्रैमासिक

३. मुद्रक, प्रकाशक,

संपादक : रामचंद्र केशव मुटाटकर

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ६४, आनंद पार्क, पुणे - ४११ ००७.

४. स्वामीत्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मी, रा.के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी २००५ रा. के. मुटाटकर

प्रकाशक

( पृष्ठ २२ वरून पुढे)

न्यायाच्या सखोल विवेचनावर आधारलेला आहे. या निर्णयानंतर या कायद्याखालील कामकाज सुरु झाले. तथापि ३१ जुलै १९८६ रोजी महाराष्ट्र शासनाने गोपनीय आदेश काढून या कायद्यांच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली होती. थोडक्यात या दोन्ही कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक असलेल्या सत्ताधाऱ्यांचा इच्छाशक्तींचा अभाव आहे की, ही विदारक वस्तुस्थिती वेळोवेळी स्पष्ट झालेली आहे.

वन जमिनींमधून आदिवासींना हुसकावून लावण्याच्या वन आणि पर्यावरण खात्याच्या निर्दयी कडक धोरणांमुळे महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये भयानक असंतोष खदखदत आहे. आदिवासींना अंशतः न्याय देणाऱ्या आदिवासी कायदे क्रमांक ३५/१९७४ आणि क्रमांक १४/१९७५ ३० वर्षांची मुदत संपल्याने अस्तित्त्वातच राहिलेले नाहीत. भारताच्या राज्यघटनेत जोपर्यंत आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी खास तरतुदी अस्तित्त्वात आहेत, तोपर्यंत या दोन्ही आदिवासी कायद्यांची मुदत वाढविणारी सुधारणा नागपूर येथे डिसेंबर २००५ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात होणे नितांत गरजेचे आहे. या दोन्ही कायद्यांची मुदत वाढविण्यात आली नाही, तर आदिवासींमध्ये आधीच असलेल्या असंतोषास आणखी भर पडणार आहे. नक्षलवाद्यांना बळ प्राप्त होणार आहे. तेव्हा आदिवासी क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संघटनांना या दोन कायद्यांची मुदत वाढवून घेण्यासाठी तीव्र संघर्ष नजीकच्या काळात अपरिहार्यपणे करावा लागणार आहे. ■■

मिलिंद बोकील


# आपणातले आदिवासी आणि आदिवासींतले आपण

आपणा सर्वांना आदिवासींविषयी जे कुतूहल वाटते, त्याचे ख़रे कारण आपल्यालाच आपल्या आदिम जीवनाविषयी कुतूहल असते हे आहे. आपण आता तथाकथित पुढारलेल्या समाजात राहत असलो तरी आपण पूर्वी कसे होतो, कसे जगत होतो, आपल्या चालीरीती काय होत्या हे समजून घ्यायला आपल्याला आवडते. त्याचा काही एक अंदाज आपल्यातल्या आदिवासींमुळे येईल असे वाटत असते. त्यामुळे आदिवासी जीवनाविषयी आपल्याला एक नैसर्गिक ओढ वाटते.

हे कुतुहल पुरवताना इथे प्रथम हे स्पष्ट करायला पाहिजे की 'आदिवासी' हा शब्द मर्यादित अर्थाने खरा आहे. आदिवासी शब्दाचा अर्थ 'त्या त्या ठिकाणचे आद्य किंवा मुळचे रहिवासी' असा होतो. भारतातले आजचे आदिवासी हे बहुतांशी इथले मुळचे रहिवासी आहेत हे खरे आहे, पण ज्यांना आदिवासी म्हणत नाहीत असेही अनेक मानवसमूह हे इथलेच मुळचे रहिवासी आहेत.

कोण आदि-वासी आणि कोण नंतरचा हे ठरवण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक असतात. एक म्हणजे यासाठी आपण कोणती समयरेखा (म्हणजे इतिहासातील कोणते साल) वापरणार? किती वर्षापूर्वीच्या माणसाला आपण आदिवासी म्हणणार? दोन हजार? पाच हजार? दहा हजार? पंचवीस हजार? दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्या भौगोलिक सीमारेषा वापरणार? एखाद्या ठिकाणचा आदिवासी म्हणताना कोणत्या काळातला हे जसे ठरवणे जरुरीचे आहे, तसेच कोणत्या भूभागातला हेही स्पष्ट करणे आवश्यक आहे. आज जो भारत देश आपण म्हणतो तो तर फक्त ५७ वर्षांपूर्वी अस्तित्वात आला आहे. इतिहासातल्या भारताच्या सीमारेषा वेगवेगळ्या होत्या. कधी त्यात फक्त सरस्वती नदीकाठचा प्रदेश होता तर कधी अफगणिस्तानपासून ब्रह्मदेशपर्यंतचा.
मुख्य म्हणजे भारताच्या प्राचीन मानवी वसाहतींबाबत आपले ज्ञान प्रचंड तोकडे आहे. आपला इतिहास नीट लिहिलेला नाही. भूगोल जणू अस्तित्वातच नव्हता. शिवाय इतिहासपूर्व काळात झालेल्या घडामोडींबद्दल आपल्याला काहीही माहीत नाही. अशा परिस्थितीत कोण खरा 'आदि-वासी' हे ठरविणे फार कठीण जाते.

मूळचे आणि नंतरचे असे वर्गीकरण तयार होते त्यामागे काही मानवशास्त्रीय कारणे आहेत. त्यातले सर्वात महत्वाचे म्हणजे माणूस नक्की कुठे उत्पन्न झाला याविषयी अद्यापही पुरेशी माहिती नाही. आपण आज जे मानव आहोत त्यांना शास्त्रीय इंग्रजी भाषेत 'होमो सेपियन्स सेपियन्स' असे म्हणतात. होमो सेपियन्स म्हणजे शहाणा माणूस. ह्या शहाण्या माणसाच्या अगोदर 'होमो हॅबिलिस' म्हणजे हत्यारे बनवणारा माणूस आणि



'होमो इरेक्टस' म्हणजे उभा राहिलेला माणूस अशाही माणसांच्या प्रजाती (इंग्रजीत - स्पिसिज) मानल्या जातात. ह्या प्रजाती निरनिराळ्या असल्या तरी त्यांचे कुटुंब म्हणजे फॅमिली एकच होती. तिला होमो किंवा होमिनीड असे म्हणतात. होमिनीडच्या अगोदरच्या टप्प्यावर मानवसदृश प्राणी होते. सस्तन प्राण्यांच्या ज्या विशिष्ट प्रकारातून माणूस उत्पन्न झाला त्यांना इंग'जीत प्रायमेट्स असे म्हटले जाते. त्यामध्ये निरनिराळ्या जातींच्या माकडांचा समावेश होतो. गोरिला, चिम्पांझी यांसारखी महाकाय माकडेही (एपूस) याच वर्गात मोडतात. ही माकडे व माणूस (होमिनीड) यांच्यामध्ये माकडसदृश मानवांच्या निरनिराळ्या जाती होत्या. या मानवांचे जिवाश्म ज्या ठिकाणी सापडले त्यावरून त्यांना ऑस्ट्रॅलोपिथेकस, पेकिंग माणूस, निअेंडरथाल अशी निरनिराळी नावे पडली आहेत.

पृथ्वीवर प्रायमेट्स निर्माण होण्याचा काळ आजपासून साधारण सहा ते साडेसहा कोटी वर्षे इतका आहे. ओरँगउटान दीड ते पावणेदोन कोटी वर्षांपूर्वी, गोरिला ऐंशी लाख ते एक कोटी वर्षांपूर्वी, चिम्पांझी पासष्ट ते पंचाहत्तर लाख वर्षांपूर्वी तर ऑस्ट्रॅलोपिथेकस सुमारे चाळीस लाख वर्षांपूर्वी अस्तित्वात आला. होमो सेपियन्सचा जन्म साधारण दीड ते दोन लाख वर्षांपूर्वीचा. हा सगळा काळ इतका लांबचा आहे की त्याबाबत काही ठाशीव विधान करणे शहाणपणाचे नाही. आपल्याला माहीत आहेत ते फक्त उत्क्रांतीचे काही टप्पे.

मानवशास्त्राच्या नवीन संशोधनाप्रमाणे आज पृथ्वीवर दिसणाऱ्या सर्व माणसांचे मूळ दक्षिण-पूर्व अफ्रिकेमध्ये आहे. या प्रमेयाला 'मायटोकॉंड्रियन इव्ह हायपोथेसिस' असे म्हणतात. (स्ट्रिंगर व ॲन्ड्रिज, १९८८; विल्सन व कॅन, १९९२). आपल्या शरीरातील पेशींच्या केंद्रावर जशा गुणसूत्रांच्या जोड्या असतात तशाच मायटोकॉंड्रिया नावाच्या शक्ती पुरवणाऱ्या घटकावरतीही असतात. आपल्या पेशींची रचना पाहिली तर त्यात एक केंद्र, त्या भोवती पेशीद्रव्य व त्या भोवती पेशीभिंत असते. पेशीद्रव्यातील मायटोकॉंड्रिया हा घटक पेशींच्या चयापचयाला शक्ती पुरवतो. पेशीकेंद्रावरची गुणसूत्रे ही स्त्री व पुरूष या दोघांच्या गुणसूत्रांनी मिळून बनलेली असतात आणि म्हणून प्रत्येक संयोगात बदलत असतात. पण मायटोकॉंड्रिया हा पदार्थ केवळ मातृपेशीकडून म्हणजे आईकडून येत असल्याने त्यावरची गुणसूत्रे ही फक्त आईची असतात आणि ती स्त्री-पुरूष संयोगाने बदलत नाहीत. त्यामधला बदल हा फक्त आकस्मिक घडामोडींनी (म्युटेशनमुळे) होतो. त्यामुळे ह्या प्रक्रियेने होणारे फरक वेगळे काढत आणि ही प्रक्रिया मागे मागे तपासत गेल्यास आणि त्यांची तुलना करत गेल्यास आजच्या सर्व माणसांची मूळ आई कोण ते समजू शकते.

ह्या पद्धतीचा वापर करून मानवशास्त्रज्ञांनी असे मत मांडले आहे की पृथ्वीवरच्या आजच्या सर्व माणसांची आई दीड लाख वर्षापूर्वी दक्षिण-पूर्व अफ्रिकेमधल्या एखाद्या समूहात राहत असावी. ही आपल्या सगळ्यांची एक आई होती. तिच्यापासून उत्तरोत्तर जी संतती तयार झाली ती अफ्रिकेतून इतरत्र पसरली. या माणसांनी आधीची जी माकडसदृश माणसे होती किंवा होमो इरेक्टस सारखे प्राणी होते त्यांच्या जागी स्वत:ची वस्ती केली. ही प्रक्रिया फार अलीकडच्या काळात म्हणजे गेल्या फक्त दीड ते दोन लाख वर्षात घडली. या प्रमेयाला इंग्रजीत 'आउट ऑफ अफ्रिका हायपोथेसिस' असे म्हणतात. जगातल्या जवळपास सर्व मानवशास्त्रज्ञांचे या बाबतीत एकमत आहे (चियारेली,१९९४).

हे प्रमेय खरे मानले तर त्यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे आजची पृथ्वीवरची सर्व माणसे ही मुळात एकच आहेत आणि ज्या भूभागात ती आज आढळतात तिथे ती अफ्रिकेतून हळूहळू पसरून स्थायिक झाली. म्हणजे आज दक्षिण अमेरिकेत सापडणारे इंडियन्स, टुंड्रा प्रदेशातले एस्किमो, अफ्रिकेतले बुशमेन, भारतातील गोंड, मलेशियातले मलायान, चीनमधले मंगोल वा उत्तर युरपमधले स्कॅन्डिनेव्हियन हे सर्व मुळात एकाच वृक्षाच्या फांद्या आहेत. ते वेगवेगळ्या काळात त्या त्या भूभागात आले आणि हजारो वर्षांच्या जुळवून घेण्याच्या, आकस्मिक घडामोडींच्या, विशेषीकरणाच्या निरनिराळ्या जीवशास्त्रीय प्रक्रियांमधून त्याच्यांत आज दिसतात तसे भेद दिसायला लागले.

ह्या ठिकाणी थोडक्यात मानवी वंश ह्या कल्पनेचे स्पष्टीकरण केले पाहिजे. वंश म्हणजे एक कूळ असा त्याचा अर्थ घेतला जात असेल तर प्रश्न नाही (वंश, वंशज). पण बऱ्याचदा वंश म्हणजे प्रजाति असे समजले जाते आणि मग गोंधळाला सुरवात होते. लोकांची अशी समजूत असते की मुळातच मानवात निरनिराळे वंश आहेत (गोरे, काळे, पिवळे किंवा नॉर्डिक, अफ्रिकन, मंगोल, इत्यादी) आणि माणसाची उत्पत्ती अशा निरनिराळ्या वंशात झाली. वंश-भिन्नत्वाच्या या कल्पनेमधूनच वंशभेदाची आणि वंशश्रेष्ठत्वाची कल्पना उगम पावते. मग काही वंश हे मूलत:च श्रेष्ठ आणि काही कनिष्ठ अशी समजूत होऊन बसते. इथे वंश हा शब्द इंग्रजीतील 'रेस' (Race) ह्या शब्दाला समानार्थी वापरला जातो. ह्यातून कालपरवापर्यंत मोठमोठे मानवशास्त्रज्ञही सुटले नव्हते. त्यामुळे 'रेसेस ऑफ मॅन' या विषयावर जाडजूड ग्रंथ लिहिले गेले.

याचा अर्थ माणसा-माणसांत भेद नाहीत किंवा ती वेगवेगळी दिसत नाहीत असा नाही.



सोनेरी केसांचा, निळ्या डोळ्यांचा, उंच गोरापान जर्मन, काँगोमधले काळे बुटके पिग्मी आणि मिचमिच्या डोळ्यांचा पिवळा चिनी माणूस एकमेकांपेक्षा प्रचंड वेगवेगळे दिसतात. पण हे भेद वरवरचे आहेत. माणसाने पर्यावरणाशी जुळवून घेतल्याच्या (बायॉलॉजिकल ॲडॅप्टेशन'च्या) प्रक्रियेमुळे झालेले आहेत. माणूस कोणत्या हवामानात राहतो, कोणते खाद्य खातो, सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी त्याच्या शरीरात कोणते बदल होतात या सर्वांवरून त्याचे शारीरिक रंगरूप ठरत असते. शिवाय आकस्मिक बदल आणि जीवशास्त्रीय निवडीच्या (म्युटेशन आणि बायॉलॉजिकल सिलेक्शन) प्रकिं या कायम घडत असतात त्या वेगळ्याच.

उष्ण प्रदेशात राहणाऱ्या माणसांच्या कातडीवर सूर्याच्या उष्णतेपासून बचाव व्हावा म्हणून 'मेलॅनिन' रंगद्रव्याची अधिकाधिक निर्मिती होते व ते काळे पडत जातात. ही गोष्ट डार्विनच्या सिद्धांताच्या भाषेत सांगायची तर उष्ण प्रदेशात काळ्या लोकांचा टिकाव लागतो. तिथली माणसे काळी पडली की जगायला योग्य म्हणजे 'फिट' होतात. ह्याच्या उलट थंड प्रदेशात होते. तिथे रंगद्रव्य नाहीसे होत जाऊन त्वचा पांढरी पडत जाते. घनदाट जंगलात राहणारे प्राणी व माणसे गवताळ प्रदेशात राहणाऱ्या त्यांच्या बांधवांपेक्षा आकाराने लहान होतात कारण जंगलाशी जुळवून घेण्यासाठी लहान आकार गरजेचा असतो. तिथे लहान आकाराची माणसे जगायला 'फिट' असतात आणि म्हणून तशा लोकांची तिथे पैदास होऊ लागते. प्राणवायुची कमतरता असणाऱ्या प्रदेशात उंच, मोठी आणि टोकदार नाके असणाऱ्या लोकांचे जगणे अधिक सुलभ होत असते. अशीच गोष्ट डोळ्यांच्या व केसांच्या रंगाबाबत होत असते.

माणसे ज्या प्रदेशात दीर्घकाळ राहतात त्या प्रदेशाचा एक विशिष्ट शारीरिक प्रकार (फेनोटाइप) तयार होतो. निरनिराळ्या मानवसमूहांचा संयोग होऊनही असे विशिष्ट प्रकार तयार होतात - उत्तर यूरपमधला फेनोटाइप निराळा, मध्य-पूर्व आशियामधला निराळा, अफ्रिकेतला निराळा, भारतीय उपखंडातला निराळा. ही प्रक्रिया हजारो वर्षांच्या कालखंडात घडलेली असते. त्यामुळे तिचे बारकावे आपल्याला समजत नाहीत. ह्या जैविक निवडीच्या आणि जुळणीच्या प्रक्रियेतून घडलेल्या मानवी प्रकारांना वंश असे चुकीने समजले गेले.

वंश या कल्पनेचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे त्यातून येणारी वंशश्रेष्ठत्वाची भावना. यासाठी उत्क्रांतीवादाचा चुकीचा आधार घेण्यात आला. या कल्पना ज्यावेळी प्रसारित होत होत्या त्यावेळी सबंध जगावर गोऱ्या युरोपीय लोकांची सत्ता होती. त्यामुळे साहजिकच असे मानले गेले की मानवी उत्क्रांतीची शेवटची पायरी किंवा कळस म्हणजे निळ्या डोळ्यांची, सोनेरी केसांची, गोरी, उंच, नाकेली, युरोपीय माणसे. ती निसर्गत:च सर्वात श्रेष्ठ आहेत. आणि सर्वात खालची पायरी म्हणजे काळी, बुटकी, पसरट नाकाची आफ्रिकन माणसे. त्यांच्यात अजून उत्क्रांती व्हायची आहे, त्यामुळे ती सर्वात कनिष्ठ. या समजुतीमुळे आपण गोऱ्या, युरोपीय माणसांसारखे किंवा त्यांच्या जवळचे आहोत असे

मानण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यामुळे भारतासारख्या देशात भेदभावाला तर खतपाणी मिळालेच पण परस्पर द्वेष करण्याचीही प्रथा सुरू झाली. सर्वसामान्य लोकांच्या मनातून ही समजूत अजूनही गेलेली नाही. आदिवासी किंवा दलित यांना कमी लेखले जाते याचे पोटातले कारण हे आहे.

आधी म्हणल्याप्रमाणे या समजुती निखालस अडाणीपणावर आधारित आहेत. आज जगात दिसणारी सर्व माणसे उत्क्रांतीच्या एकाच पायरीवर आहेत, मग ती आफ्रिकन असो वा युरोपियन. त्यांच्यामध्ये जो फरक दिसतो तो पर्यावरणाने व काही जीवशास्त्रीय घडामोडींमुळे झालेला आहे. निसर्गत: त्यांच्यात उच्च-नीच असे काही नाही. युरोपात औद्योगिक क्रांती आणि सांस्कृतिक प्रबोधन झाले म्हणून त्यांची भौतिक प्रगती झपाट्याने झाली. त्या बाबतीत ते पुढे गेले, परंतु याचा अर्थ मानवी उत्क्रांतीत किंवा बुद्धिमत्तेत ते वरचढ आहेत असा नाही. प्राचीन काळी युरोपपेक्षा इतर ठिकाणच्या संस्कृती जास्त भरभराटलेल्या होत्या. मी आफ्रिकेतल्या झिंबाब्वे या देशात थोडाफार फिरलेलो आहे. तिथल्या लोकांचे 'माणूसपण' मला इतर कोणाहीपेक्षा जास्त उजवे वाटले आहे आणि ऑलिंपिकमध्ये आपण पाहतो त्याप्रमाणे, आफ्रिकन माणसे शारीरिक कौशल्याच्या बाबतीत तर इतरांपेक्षा सहज वरचढ ठरतात.

म्हणूनच 'रेस' वा वंश ही कल्पना सध्याच्या मानवशास्त्राने टाकाऊ ठरवली आहे. या गोष्टीने मानवी समाजात जो हाहा:कार माजवला त्याने खडबडून जागे होऊन १९५१ साली युनेस्कोने एक जागतिक परिषद घेऊन रेस ही संकल्पना कालबाह्य ठरवली. रेस या शब्दाने माणसांच्या निरनिराळ्या प्रजाती (स्पिसिज) आहेत असे ध्वनीत होते. पण प्रत्यक्षात तशी वस्तुस्थिती नाही. पृथ्वीवरची आजची यच्चयावत सर्व माणसे ही एकाच प्रजातिची आहेत. माणसाची प्रजाति एकच - माणूस (होमो सेपियन्स). ह्यामुळेच हल्ली 'मानववंशशास्त्र' या ऐवजी 'मानवशास्त्र' असा प्रयोग केला जातो.

या परिस्थितीतील गुंतागूंत भारतासार'या प्रदेशात अधिकच वाढते कारण गेल्या शेकडो वर्षांच्या काळात इथे अनेक मानवसमूह वसतीला आलेले आहेत. हे निरनिराळ्या मार्गांनी आणि निरनिराळ्या काळात आलेले आहेत. काही उत्तर-पश्चिमेकडून म्हणजे हिंदुकूश पर्वताकडून आले असतील, काही उत्तर-पूर्वेकडून म्हणजे आसाम-ब्रह्मदेश या मार्गाने आले असतील तर काही समुद्रमार्गाने दक्षिण-पश्चिमेकडून आले असण्याची शक्यता आहे. भारतातल्या भारतातही अनेक स्थलांतरे झाली आहेत. अनेकदा संघर्ष झाला आहे आणि त्याहीपेक्षा जास्त वेळा समन्वय आणि संकर झाला आहे. सर्वात नंतर कोण आले हे नजिकच्या इतिहासावरून ठरवणे सोपे असले तरी सर्वात आधी कोण आले किंवा त्यांच्या आधी कोण होते हे ठरवणे फार कठीण आहे. सध्या अणुजीवशास्त्राच्या मदतीने गुणसुत्रांवर (डी.एन.ए. वर) संशोधन करून, काही ठोकताळे बांधण्याचे काम चालू आहे. (गाडगीळ व इतर, १९९८). ते संशोधन प्रगत झाले तर पुढच्या काही वर्षात आणखी अंदाज बांधता येतील.

इंग्रजी भाषेत वर्णन करताना आदिवासींसाठी भारतात 'ट्रायबल' (Tribal) हा शब्द वापरला जातो. हा समूहवाचक आणि विशिष्ट जीवनशैली दाखवणारा शब्द आहे. त्यात मूळ स्थान वा काळाचा निर्देश केला जात नाही. त्यामुळे एक संज्ञा म्हणून तो जास्त योग्य आहे. आदिवासी शब्द 'ट्रायबल' शब्दाला समानार्थी म्हणून उपयोगात आणला जातो, पण 'आदि' हे संबोधन कालवाचक घेतले तर त्यात गुंतागुंत निर्माण होते. आधीचे आणि नंतरचे हा विचार ही पाश्चिमात्यांची, विशेषत: युरोपीय लोकांची, देणगी आहे.

युरोपीय लोकांनी अमेरिका, आफ्रिका आणि आशिया खंडात वसाहती केल्या तेव्हा तिथे 'मूळचे' लोक होते. त्या लोकांना त्यांनी 'आदिवासी' म्हटले (इंग्रजीत इंडिजिनस, ऑटोक्थॉन्स, ॲबॉरिजिनिझ -खपवळसशर्पेी / अींलहींहेपशी / अलेीळसशपशी). आजही संयुक्त राष्ट्र संघटनेच्या संस्था, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (आय एल ओ) किंवा परदेशी स्वयंसेवी संस्था 'इंडिजिनस' शब्दाचा आग'ह धरत असतात. त्यांच्या दृष्टीने ते बरोबर आहे, पण भारतातली वस्तुस्थिती तशी नाही. त्या दृष्टीकोनातून भारतात सर्वच लोकांना आदिवासी म्हणावे लागेल.

या बाबतीतला गोंधळ आपल्या घटनेतील अनुसूचीने आणखी वाढवला आहे. ज्या जमातींचा समावेश अनुसूचित जमातींच्या (शेड्युल्ड ट्राइब्स) यादीत करण्यात आला आहे त्यांनाच आपण आज आदिवासी समजतो. एखादी जमात म्हणजे समाज आदिवासी आहे की नाही हे ठरवण्यासाठी आठ निकष लावण्यात आले होते आणि त्याप्रमाणे १९५० साली ही यादी तयार करण्यात आली. त्यानंतरही राष्ट्रपतींचे विशेष हुकूम निघून काही जमातींचा समावेश या यादीत केला गेला. ही यादी सर्वसमावेशक व्हावी असा प्रयत्न झाला असला तरी त्यात दोन मुख्य त्रुटी राहिलेल्या आहेत.

एक म्हणजे, काही जमाती ज्या सर्वसाधारण समाजात मिसळून गेल्या होत्या, त्यांना आदिवासी दर्जा प्राप्त झाला तर दुसरी म्हणजे, काही जमाती ज्या खरोखरच आदिम जीणे जगत होत्या त्यांचा समावेश या यादीत झाला नाही. तसेच ही यादी 'समूहवार' नसून 'राज्यवार' होती. काहींना एका राज्यात आदिम समजले गेले तर दुसऱ्या राज्यात त्यांचा समावेश केवळ मागासवर्गियांमध्ये झाला. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात विदर्भातील कैकाड्यांचा समावेश अनुसूचित जातींमध्ये (एस.सी.) तर इतर जिल्ह्यांत भटक्या-विमुक्त जमातींत (व्ही.जे.एन.टी.) केला गेला आहे. हेच कैकाडी आंध्र प्रदेशात 'आदिवासी' (एस.टी.) मानले गेले आहेत. त्यांना आदिवासी समजायचे की नाही?

सबंध भारतात मिळून ४६१ आदिवासी समूहांचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये केलेला आहे. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे त्यांची भारतातील लोकसंख्या ५,१६,२८,६३८ इतकी आणि एकूण लोकसंख्येच्या ७.७६% इतकी होती तर २००१ च्या लोकसंख्येप्रमाणे ती ८,४३,२६,२४६ इतकी (८.२%) होती. टक्केवारी समजण्यासाठी १९८१ चीच जनगणना ग्राह्य धरणे चांगले कारण नंतरच्या जनगणनेत अनेक बिगर-

आदिवासी लोकांनी स्वत:ला आदिवासी म्हणणे सुरू केले. आदिवासींचे प्रमाण पूर्वीच्या मध्य प्रदेशात सर्वात जास्त होते. आता ते नव्याने निर्मिलेल्या छत्तीसगडमध्ये जास्त आहे.

महाराष्ट्रातले प्रमाण ८.४% आहे. सध्या अनेक मागासवर्गीय जमातींना अनुसूचीत व्हायची इच्छा आहे. तशा मागण्या सतत होताना दिसतात. आता ह्या जमाती जर यादीत समाविष्ट झाल्या तर केवळ त्यामुळे त्यांना 'आदि-वासी' म्हणायचे का?

अनुसूचित जमातींना सरसकट मूळचे समजण्यामागची दुसरी एक अडचण म्हणजे इथला आदिवासी समाज हा इतर ग्रामीण वा नागरी समाजापेक्षा फारसा भिन्न नाही. आदिवासी भागात गेल्यावर वेशभूषा, बोलणे-चालणे, राहणीमान वेगळे दिसेल, पण हा भेद वरवरचा आहे. मुंबईसारख्या शहरात जिथे सर्व भारतातील लोक एकत्र आलेले असतात, तिथे केवळ नुसत्या दिसण्याने अमुक माणूस आदिवासी आणि अमुक ब्राह्मण असे ठरवता येणार नाही. भारतातले आदिवासी इतरांपेक्षा भिन्न दिसत नाहीत याचे कारण मुळात ते भिन्न नाहीत हे होय.
हे अभिन्नत्व कशाने आले याची चर्चा नंतर करू. इथे लक्षात घेण्याचा मुद्दा असा की आदिवासी हा शब्द 'ट्रायबल' या अर्थाने ग्रामीण व नागरी समाजापेक्षा भिन्न जीवनशैली दर्शवणारा शब्द आहे आणि त्याअर्थाने तो वापरला पाहिजे. आद्यतन वस्तीशी त्याचा थेट संबंध नाही. वेगळ्या वंशाशी तर मुळीच नाही. प्रख्यात समाजशास्त्रज्ञ गो.स.घुर्ये यांनी निसंदिग्धपणे लिहिले आहे की भारतातील आदिवासींसाठी 'ॲबॉरिजनल' हा शब्दप्रयोग करणे हे शास्त्रीयदृष्ट्या चुकीचे तर आहेच पण व्यावहारिकदृष्ट्याही अनावश्यक आहे (घुर्ये, १९६३:१३).

आदिवासींसाठी 'वनवासी' असा शब्द काही मंडळी योजतात, पण हा शब्द तर सत्याचा विपर्यास करणारा आहे. कारण भारतातील बहुसंख्य आदिवासी खेड्यात राहून, शेतीच्या आधाराने गुजराण करतात. त्यांना वनवासी म्हणणे योग्य होणार नाही. शिवाय भारतीय परंपरेत 'वनवास' या शब्दाला एक वेगळा अर्थ प्राप्त झालेला आहे. याशिवाय आदिवासींसाठी गिरीजन, आदिम जाती असेही शब्द योजले जातात. हे शब्द मर्यादित अर्थानेच खरे आहेत. त्यामुळे आता ज्याचे वळण पडले आहे असा आदिवासी शब्दच वापरणे योग्य आहे, मात्र त्यामागचा अर्थ नीट लक्षात ठेवायला हवा.

भारतात आदिवासी वस्ती कुठे कुठे आढळते? भौगोलिकदृष्ट्या त्याचे काही पटटे आहेत. पहिला म्हणजे हिमालयातील रांगात ईशान्येकडचा म्हणजे आसाम, मेघालय, अरुणाचल, त्रिपुरा, मिझोराम ह्या राज्यांमधला. तिसरा छोटा नागपूर ते बस्तर-तेलंगण म्हणजे दक्षिण बिहार, पूर्व मध्यप्रदेश, ओरिसा, पूर्व महाराष्ट्र, उत्तर आंध्रप्रदेश असा. चौथा म्हणजे पश्चिम भारतातील अरावली, विंध्य, सातपुडा व सह्याद्री रांगा. पाचवा, दक्षिण भारतातील निलगिरी व इतर डोंगराळ भाग.

पूर्वी भारतातील माणसांचे वर्गीकरण जेव्हा शारीरिक फरकांच्या आधारे (वंशिक पद्धतीने) केले जाई, तेव्हा आदिवासी समूहांचे वर्गीकरणही त्याच प्रकारे होत असे. पण आता त्या

प्रकारचे मानवशास्त्र प्रचलित नाही. त्यामुळे भाषिक आधारावरही वर्गीकरण केले जाते. या वर्गीकरणाप्रमाणे भाषांचे मुख्यतः चार गट मानले गेले आहेत - उत्तर हिंदुस्थानी (इंडो-आर्यन), द्रविड, तिबेटी-ब्रह्मी आणि मुंडारी (ऑस्ट्रो-एशियाटिक). भारतातल्या सुमारे ४५० आदिवासी समूहांपैकी १६३ समूह उत्तर हिंदुस्तानी भाषा बोलतात (३६%) तर १०७ समूह द्रविड (२४%), १४३ तिबेटी-ब्रह्मी (३२%), ३० ऑस्ट्रो-एशियाटिक (७%) आणि ४ समूह अंदमानी भाषा बोलतात (सिंग, १९९७:४०). हिमालयातील जौंसारी हिंदीचीच पहाडी बोली बोलतात तर तिथलेच भूतिया, लेपचा, लडाखी, शेर्पा हे तिबेटी भाषा बोलतात. ईशान्येकडील नागा, गारो, वांचू, लूशाई इत्यादी लोकांच्या भाषाही तिबेटी-ब्रह्मी भाषासमूहांतल्या मानल्या जातात. छोटा नागपूर परिसरातल्या हो, खासी, संथाळी, कोरकू, मुंडा, साओरा, इत्यादी आदिवासींच्या भाषा ऑस्ट्रो-एशियाटिक समूहांतल्या आहेत तर अरवली-विंध्य-सातपुडा-सह्याद्रिमधले भिल्ल, मिना, वारली, गराशिया, बैगा आदिवासी उत्तर हिंदुस्तानी भाषासमूहाशी जोडलेले आहेत. बस्तरमधील गोंडी भाषा ही द्रविड भाषांपैकी आहे. दक्षिण भारतातील चेंचू,कोडगू, येरकुला, गडबा, तोडा आदिवासी हे कोणती तरी दाक्षिणात्य भाषा बोलतात. गोंड, संथाळ किंवा खासी-गारो यासारख्या मोठ्या जमाती वगळल्या तर बहुतेक आदिवासी समूहांची भाषा ही त्यांच्या भोवतालच्या ग्रामीण समाजाचीच भाषा असते.

भाषिक आधारावरचे वर्गीकरणही काही योग्य आहे असे नाही कारण त्यात वंश आणि भाषा यांची गल्लत करण्यात आली आहे. जी माणसे वेगवेगळ्या भाषा बोलतात ती एकमेकांनासून वेगवेगळी आहेत असे समजण्याची त्यात चूक झाली आहे. भारतात गेल्या वीस-पंचवीस हज़ार वर्षांत भाषांची केवढी तरी सरमिसळ झाली आहे. ती कशी आणि केव्हा झाली त्याबद्दल आपल्याला काहीच माहीत नाही. भारतात इतके भाषिक समूह कसे तयार झाले ही मुळातच इतकी गुंतागुंतीची गोष्ट आहे की त्यात आदिवासी समूहांची मूळ भाषा कोणती होती याचे उत्तर शोधणे आणखीच कठीण झाले आहे.

भारतीय इतिहासाविषयीचे सर्वसामान्यांचे आकलन हडप्पा किंवा सिंधू संस्कृतीपासून सुरू होते. प्रचलित समजूत अशी आहे की पूर्वी भारतात सिंधू संस्कृती होती. तीवर वायव्येकडून आलेल्या पशुपालक आर्यांनी आक्रमण केले. त्यांच्या जवळ घोडे आणि लोखंडी शस्त्रे असल्याने त्यांनी स्थानिक लोकांचा पाडाव केला आणि सिंधू संस्कृती नष्ट करून आपली वैदिक संस्कृती स्थापन केली. या समजाचे दुसरे एक रूप म्हणजे भारतात द्रविड लोकांचे राज्य होते. त्यावर आर्यांनी हल्ला केला आणि द्रविडांना दक्षिणेत म्हणजे विंध्यापलीकडे रेटले. तेव्हापासून आर्य उत्तरेकडे आणि द्रविड दक्षिणेकडे अशी विभागणी झाली. या समजुतीचेच पुढचे आकलन (जे मुख्यतः दक्षिणेकडच्या राज्यातून आले आहे), ते म्हणजे द्रविडांपूर्वी इथे आदि-द्रविड म्हणजे जंगलात राहणारे आदिवासी राहात होते. द्रविड शेती करणारे होते. त्यांनी या आदिवासींना

जंगलात रेटले आणि शेती करायला सुरवात केली. नंतर पशुपालक आणि आक्रमक आर्य आले. त्यांनी द्रविडांना दक्षिणेकडे पिटाळून लावले. आदिवासी जे जंगलात राहिले ते राहिलेच.

इथे हे स्पष्टपणे सांगायला पाहिजे की या समजुती अर्धवट ऐतिहासिक ज्ञानावर आधारलेल्या आहेत आणि हे अर्धेकच्चे ज्ञान युरोपीय इतिहासकारांच्या अज्ञानातून, सत्य सापडल्याच्या अभिनिवेशातून आणि अहंगंडातून निर्माण झालेले आहे. या समजुती मुख्यतः एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तयार झाल्या आणि आपल्याकडील पंडितांनी पुरेशी चिकित्सा न करताच त्या स्वीकारल्या. मॅक्स मुलर या जर्मन भाषाशास्त्रज्ञाने 'आर्य वंश' (Aryan Race) हा शब्दप्रयोग सर्वात पहिल्यांदा केला. नंतर त्याने अनेकवेळा खुलासा केला की त्याला 'आर्य' हा शब्द फक्त भाषा किंवा संस्कृतीच्या संदर्भात (Aryan Culture) अभिप्रेत होता, वंश म्हणून नव्हे, पण त्या गोष्टीची नोंद घेतली गेली नाही. आर्यांच्या आक्रमणाच्या सिद्धांताने भारतीयांच्या मनाची पकड घेतली ती कायमचीच. त्यातच हिटलरसारख्यांनी आर्यांच्या वंशश्रेष्ठत्वाचा डांगोरा पिटल्यामुळे भारतातील उच्चवर्णीयांच्या मनात एक अहंगंड आणि इतरांच्या मनात न्यूनगंड तयार झाला.

या समजुती निर्माण झाल्या तर झाल्या, पण नंतर मानवशास्त्र, पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र, इत्यादिंमध्ये जे नवनवीन संशोधन होत राहिले त्यामुळे त्या बदलाव्यात की नाही? पण तेही झाले नाही. उदाहरणार्थ, मोहेंजोदडो शहरात सापडलेल्या हाडांच्या सांगाड्यांवरच्या काही खुणांवरून आर्यांच्या आक्रमणाचा आणि शहरात झालेल्या कत्तलीचा सिद्धांत रचला गेला; पण या सांगाड्याचा पुन्हा नीट अभ्यास केल्यावर असे लक्षात आले आहे की या खुणा कोणत्याही शस्त्राच्या नाहीत. अशी लढाई तिथे झालीच नसावी. घोडा हा प्राणी माणसाळवण्याचे पुरावे हडप्पा संस्कृती किंवा त्याच्या पूर्वीही मिळालेले आहेत. लोखंडाचा शोध वायव्येकडून येणाऱ्या लोकांच्या अगोदर मध्य भारतातील लोहखनिजांच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांनाही लागला असणे शक्य आहे. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास हा पर्यावरणातील बदल, नद्यांना येणारे पूर आणि समुद्राच्या पाण्याचा दबाव या कारणांनी झाला असावा असे नवीन संशोधनाने सूचित होते आहे. पण हे संशोधन सर्वापर्यंत न पोहोचल्याने जुन्या समजुती तशाच कायम आहेत आणि त्यापायी भारतीय समाजाच्या एकात्मतेची मात्र अपरिमित हानी होते आहे.

हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी माणसाचा एकूणच इतिहास थोडासा समजून घ्यायला हवा. मानवशास्त्रात माणसाच्या संस्कृतीचे काही टप्पे कल्पिण्यात आले आहेत. ते मुख्यतः त्याच्या तांत्रिक कौशल्यावर आधारित म्हणजे तो कोणत्या प्रकारचे नैसर्गिक साहित्य वा हत्यारे वापरत होता त्यावरून ठरवले जातात. त्या प्रमाणे दगडाची हत्यारे वापरणारी अवस्था ही अश्मयुगीन, तांब्याची ताम्रयुगीन आणि लोखंडी हत्याराची लोहयुगीन मानली जाते.

अश्मयुगीन अवस्था ही अर्थातच सर्वात जास्त काळ टिकलेली होती. तिचे तीन भाग पाडलेले आहेत:

पूर्वीचे (पुराश्मयुग - Paleolithic), मधले (मध्याश्मयुग - Mesoolithic) आणि अलीकडचे (नवाश्मयुग - Neolithic).

पुराश्मयुग हे सुद्धा फार मोठे असल्याने त्याचे तीन भाग पाडलेले आहेत. भारतातील प्रथम पुराश्मयुग हे पाच लाख वर्षांपेक्षा मागे जाते. मध्य-पुराश्मयुग हे साधारण आजपूर्वी ५०,००० ते २०,००० वर्षे तर नूतन पुराश्मयुग हे २०,००० ते १०,००० वर्षांपर्यंत मानले जाते. त्यानंतरचा मध्याश्मयुगाचा काळ हा आजपूर्वी १०,००० ते ४,००० वर्षे इतका मानतात. हा सगळ्या जगभर सारख्याच प्रमाणात नाही. केवळ शास्त्रीय सोयीकरता हा टप्पा मानला जातो. खरे तर तो पुराश्मयुगाचाच एक भाग आहे. पुराश्मयुगात माणूस भटका शिकारी व अन्नसंग्राहक होता. मुख्यत: दगडाची नानाविध हत्यारे तो वापरत असे. काठीच्या टोकाला दगडी, धारदार अग्र बसवून त्याचा भाला तो करत असे. फळे, कंदमुळे, गवत, पाने आणि मांस हा त्याचा आहार होता.

या नंतरचे नवाश्मयुग फार महत्वाचे मानले जाते. कारण शेतीची क्रांती त्या काळात झाली. माणूस ओबडधोबड पद्धतीने शेती करू लागला. काही प्राणीही त्याने माणसाळवले. तो मातीची भांडी तयार करू लागला. ह्या काळाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे स्थिर वसाहत आणि अन्नाचे उत्पादन. आधीच्या काळात माणूस भटकत असे आणि जंगलातून अन्न गोळा करत असे. आता एके ठिकाणी राहून आपले अन्न आपणच निर्माण करण्याची विद्या त्याला प्राप्त झाली. भारतात हा काळ आजपूर्वी सुमारे ६,००० वर्षे सुरू झाला असे मानले जाते. पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते मध्याश्मकालीन भटके शिकारी आणि अन्नसंग्राहकांना, इसवी सन पूर्व ७,५०० ते ३,००० या काळात, पर्यावरण उत्तरोत्तर उजाड होत गेल्याने शेतीकडे वळावे लागले (ढवळीकर, १९८५: ९,८४).

दगडाच्या हत्यारांनंतर तांब्याची हत्यारे करायचा शोध लागला. मात्र म्हणून लगेच काही दगडाची हत्यारे कालबाह्य झाली नाहीत. त्यामुळे या काळाला ताम्रपाषाणयुग म्हणतात (आजपूर्वी ४,५०० ते ३,००० वर्षे). पूर्णपणे ताम्रयुग येण्याचा भारतातला काळ हा साधारण ४,००० ते २,७०० वर्षांपूर्वीचा मानतात, म्हणजे इ.स. पूर्व २,००० ते इ.स. पूर्व ७०० हा काळ. इ.स. पूर्व ६०० पासून भारतात सर्वत्र लोहयुग सुरू झाले असे समजले जाते. ह्याच काळापासून प्राचीन इतिहासही सुरू होतो. तत्पूर्वीचा काळ हा इतिहासपूर्व आणि प्रागैतिहासिक मानला जातो (सांकलिया, १९७४: १५).

भारतामध्ये माणसाच्या सर्व आदिम अवस्थांतील वसतीचे पुरावे सापडलेले आहेत. ह्यातील सुरवातीच्या पुराश्मयुगाचा भाग सोडून दिला तरी होमो सेपियन्स जेव्हापासून पृथ्वीवर फिरायला लागला तेव्हापासून त्याची एक शाखा भारतातही वाढायला लागली असावी. हे मानवसमूह उत्तर पुराश्मयुगात भारतात सर्वत्र पसरलेले दिसतात.

त्या नंतरच्या काळात म्हणजे मध्याश्मयुगातही भारतात सर्वदूर माणसांच्या वसतीच्या खुणा सापडतात. ते पुरावे आधीच्या काळापेक्षा जास्त ठाशीव आहेत. त्यानुसार साधारण २०,०००

वर्षापासून मानवी वसतीचे सातत्य सापडते. हा माणूस भटका शिकारी व अन्नसंग्राहक होता. तो मुख्यत्वे करून नद्यांच्या काठच्या विरळ, झुडुपांच्या जंगलात राहात होता. निवाऱ्यासाठी तो बांबू, फांद्या, गवत, इत्यादी नैसर्गिक वस्तू वापरून झोपड्या बांधे किंवा डोंगरातील गुहांचा आश्रय घेई. मुख्यत: दगडाची हत्यारे वापरे. हा माणूस आजच्या शेती न करणाऱ्या आदिवासींसारखा होता असे मानायला हरकत नाही. भोपाळजवळ भिमबेटका इथे गुहांमध्ये जी रंगचित्रे सापडलेली आहेत ती या काळातल्या माणसांची निदर्शक आहेत. परस्पर संभाषणासाठी त्यांच्या जवळ एक भाषा असणार हे उघडच आहे.

भारतात नवाश्मयुगीन क्रांती इ.स. पूर्व ४,००० वर्षे झाली असे मानतात. हा काळ कदाचित आणखी मागे जाऊ शकेल. याबाबतची अनुमाने ही मुख्यत: हडप्पा पूर्वीच्या वसाहतींमध्ये सापडलेल्या पुराव्यांवरून काढलेली आहेत. या वसाहतींचे अवशेष संपूर्ण वायव्य भारतात म्हणजे अफगणिस्तान-काश्मिरपासून सिंध-सौराष्ट्रपर्यंत मिळतात. शेतीची व्यवस्था आणि माणसाळवलेली जनावरे हे ह्या काळाचे प्रमुख वैशिष्ट्य.

हडप्पा संस्कृतीचा काळ हा इ.स. पूर्व ३,७५० ते १,७०० असा मानतात. ही ताम्र-पाषाणयुगीन संस्कृती होती. तिचे वैशिष्ट्य म्हणजे ती भारतात फार व्यापक प्रमाणात पसरलेली होती. साधारण चार हजार वर्षापूर्वीपासूनची हडप्पा संस्कृतीची खेडी उत्तर व दक्षिण भारतात सर्वत्र आढळलेली आहेत. महाराष्ट्रात पुण्याजवळचे इनामगाव हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. उत्खननात सापडलेल्या अवशेषांवरून हडप्पा ही एक नागर संस्कृती होती असे जरी वाटले तरी तिच्याशी संलग्न असा फार मोठा भूभाग शेतीवर अवलंबून असणाऱ्या खेड्यांनी व्यापलेला होता. आज जसे खेडी आणि शहरे यांचे परस्परावलंबन आहे तसेच त्या काळात होते.

इनामगावात इ.स.पूर्व २,००० ते १,००० असे वसाहतीचे सातत्य स्पष्टपणे सापडते. ताम्र-पाषाणयुगीन खेडी ही अन्नधान्याच्या बाबतीत बरीचशी स्वयंपूर्ण होती. शेतीसाठी पाण्याची गरज लागते ह्याचे त्यांना ज्ञान होते आणि ते पाणी अडवून वापरण्याची कला त्यांनी विकसित केलेली होती. त्यांनी म्हैस आणि रेडे माणसाळवलेले होते (महिषासुराची मिथ्थकथा आपल्याकडे तयार होण्याचे कारण हेच). त्यांच्या गावात कुंभार, लोहार, सुतार, इत्यादी व्यावसायिक होते आणि शेतीसाठी लागणाऱ्या श्रमाची योग्य तऱ्हेने विभागणी केलेली होती. त्यांची इतर खेड्यांशी नाना तऱ्हेची देवाण-घेवाण चाले. साधारण पन्नास वर्षांपूर्वी पश्चिम महाराष्ट्र वा मराठवाड्यातील खेडी जशी होती त्याच प्रकारचे हे जीवन होते. काल-परवापर्यंत म्हणजे सुमारे तीन हजार वर्षे हे सातत्य अबाधित होते. ह्या खेड्यांमधूनच मध्ययुगीन आणि आजचा आधुनिक भारत साकारला गेला.

इनामगावसारख्या ठिकाणी दिसणारी ही संस्कृती इ.स. पूर्व १४०० ते १००० या काळात म्हणजे आजपासून सुमारे तीन ते साडेतीन हजार वर्षांपूर्वी भरभराटीला आलेली होती. परंतू इ. स.

पूर्व १००० नंतर सततच्या दुष्काळाने त्यांचे पर्यावरण हळूहळू उजाड होत गेले. कदाचित असेही झाले असेल की लोकसंख्या जास्त झाल्याने शेतीवरचा भार वाढला आणि निरंतर वहिवाटीने जमिनी नापीक होत गेल्या. शेती परवडेनाशी होऊन त्यातून सर्वांची अन्नाची गरज भागेनाशी झाली. म्हशींसारख्या मोठ्या प्राण्यांचे कळपच्या कळप बाळगणे अशक्य झाले. त्यामुळे इ.स. पूर्व ६०० ते ५०० या काळानंतर ह्या खेड्यांचे पुरावे मिळत नाहीत. दख्खन पठार हा पावसाच्या लहरीवर अवलंबून असणारा, उजाड, निमदुष्काळी भाग असल्याने पर्यावरणातल्या बदलांचा फटका या भागातील लोकांना नंतरही कायम बसत असणार.

अशावेळी ह्या लोकांनी काय केले असेल? ते कुठे गेले असतील? ह्या बाबतचा अंदाज असा आहे की त्यातल्या काही लोकांनी अडचणी स्वीकारून कोरड्या, दुष्काळी प्रदेशात, नद्यांच्या काठाने पूर्वीसारखीच शेती चालू ठेवली (कुणबी/कानडी वक्कलिग). काहीजण अधिक पावसाच्या डोंगराळ प्रदेशात शिरले आणि तिथे फिरती, डोंगरी शेती करू लागले (कोकणा, वारली, महादेव कोळी). काहींनी मोठी जनावरे पाळणेच पसंत केले आणि त्यासाठी ते घाटमाथ्यावरच्या, जास्त पावसाच्या, जंगलांकडे वळले (गवळी धनगर). काहींनी मेंढ्या-बकऱ्यांचे कळप पाळणे पसंत केले आणि द'खनच्या दक्षिण-पूर्व पठारी भागात म्हणजे सोलापूर, बेळगाव, विजापूर परिसरात ते भटकंती करू लागले (मेंढपाळ धनगर, कर्नाटकातले कुरुबा).

या गोष्टीची सिद्धता लोककथा व लोकसंस्कृतीच्या माध्यमातून ज्यांना पटवून घ्यायची असेल त्यांनी श्री. रा. चिं. ढेरे यांचे 'शिखर शिंगणापूरचा श्रीशंभूमहादेव' हे अद्ययावत पुस्तक पाहावे. श्री. ढेरे यांनी अनेक वर्षांच्या अथक परिश्रमातून आणि साक्षेपी संशोधनातून हे सिद्ध केले आहे की सबंध दख्खन पठारावरच्या पशुपालक-शेतकरी समाजांमध्ये एकात्मता आहे आणि याची प्रचिती सातारा जिल्ह्यातील शिखर शिंगणापूरच्या शंभूमहादेवासारख्या कुळदैवतामार्फत येते. ह्या कुळदैवताची स्थापना करणारा बळी (बळीप, बळीयप्पा) हा मुळचा यादव कुळातील गवळी राजा होता. यादव हा दख्खन पठारावरच्या गवळी व धनगरांमधला कुलसमूह होता. शिखर शिंगणापूर हे आंध्र प्रदेशातल्या श्रीशैल मल्लिकार्जुनाचे महाराष्ट्रातील ठाणे आहे. हा बळियप्पा हाच शिवाजी महाराजांच्या भोसले कुळाचा मूळपुरूष असून भोसले हे नाव दक्षिणेकडील 'होयसळ' कुळावरून आलेले आहे (ढेरे, २००१:३२८-३२९).

ढेरे यांच्या या अभिजात संशोधनातून पुरातत्वशास्त्राने केलेल्या अंदाजाला पुष्टी तर मिळतेच पण दख्खन पठारावरच्या कोळी, कुणबी, गवळी, धनगर, वक्कलिग, लिंगायत, गोल्ल, कुरुबा एवढेच नाही तर चेंचू, महादेव कोळी, इत्यादी जमातींमधल्या एकात्मतेची खात्री पटते. वर उल्लेखलेल्या बळियप्पाच्या आज्याचे (आईच्या वडिलांचे) नाव पंचम भिल्लम होते. अशीच प्रक्रिया थोड्याफार फरकाने भारतातल्या निरनिराळ्या भागात घडलेली असावी.

खानदेशातील आभीर राजेही गवळी राजे

म्हणून ओळखले जात आणि उत्तर हिंदुस्थानात तर अहिर-यादव हा एक भव्य लोकसमाज आहे. या संस्कृतीतील लोकांना जगण्यासाठी निरनिराळे मार्ग स्वीकारणे भागच होते, नाहीतर एका ठिकाणी सगळ्यांनाच नष्ट व्हायची पाळी आली असती. निरनिराळे मार्ग स्वीकारतानाही, नैसर्गिक साधन संपत्तीच्या वापरासंबंधात (Resource Use) एकमेकांशी स्पर्धा आणि संघर्ष होणार नाही याची दक्षता साहजिकच घेतली गेली. त्यामुळे धनगरांमध्ये मेंढपाळ धनगर, सणगर धनगर, गवळी धनगर, खुटे धनगर, इत्यादी पोटभेद जसे तयार झाले तसेच पारध्यांमध्ये गायपारधी, हरणपारधी, फासेपारधी, राजपारधी असे गट तयार झाले. या समूहांना मदतगार होतील असे चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी असे कारू किंवा बलुतेदार आणि तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डौऱ्या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाना, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराल (कोरबू) व भोई असे नारू किंवा आलुतेदारही तयार झाले (आत्रे,१९८९: २४). तसेच त्यांच्या विविध गरजा भागवणारे वैदू, पाथरवट, वडार, कैकाडी, घिसाडी, नंदीबैलवाले, लमाण, कुंचेवाले, कोल्हाटी, गोपाळ, भुत्ये, आराधी, इत्यादी फिरस्तेही निर्माण झाले.

अर्थात महाराष्ट्र हा उत्तर व दक्षिण यांच्या संगमावरचा प्रदेश असल्याने यातील काही गट हे अलीकडच्या काळात उत्तरेकडून तर काही दक्षिणेकडून येऊन इथे स्थायिक झाले असणेही शक्य आहे. यातील प्रत्येकाने नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराचा एकेक कोनाडा (Ecological Niche) निर्माण केला, त्याच्या वापराचे जातिनिहाय नियम केले आणि शतकानुशतके ते त्या कोनाड्याला चिकटून राहिले. मऱ्हाठी भाषाही अशाच सरमिसळीतून तयार झाली. मराठी भाषेत संस्कृतबरोबरच तमिळचा फार मोठा अंश आहे हे श्री. विश्वनाथ खैरे यांचे प्रतिपादन पाहिल्यास त्याची खात्री पटते (पाहा, खैरे यांचे 'अडगुलं मडगुलं', २००१). खैरे यांनी 'अडगुलं मडगुलं' या पुस्तकातून संस्कृत-मराठी-तमिळ यांच्या संबंधांचा जो सिद्धांत मांडला आहे तो वरील अनुमानांना पुष्टी देणारा आहे. दख्खन पठारावरचे सांस्कृतिक ऐक्य समजून घ्यायचे असेल तर हे पुस्तक वाचण्याशिवाय पर्याय नाही.

यातील जे लोक जमिनीला धरून राहिले (कुणबी-मराठा), त्यांना अडीअडचणी असल्या तरी, शेतीतल्या सुधारणेमुळे अधिक स्वास्थ्य, स्थिरता व समृद्धी मिळाली. त्यांची पैदास अधिक झाली. जमीनमालकीमुळे सामाजिक दर्जा उच्चीचा राहिला. संख्याधिक्यामुळे व वेळप्रसंगी शिपाईपेशा पत्करल्यामुळे ग्रामीण सत्ताही त्यांच्या ताब्यात राहिली. बाकीचे लोक जगून राहिले पण त्यांचे स्थान काठावरचेच राहिले.

मात्र व्यवसायात आणि जातीत अशा रीतीने भिन्नता आली तरी मुळात हे सर्व एकाच संस्कृतीचे वारसदार ही गोष्ट शाबूत राहतेच. कुळदैवते, चालीरीती, लग्नपद्धती, धार्मिक आचार विचार, लोकगीते यामधून तर ही प्रादेशिक एकात्मता जाणवतेच, पण डी. एन. ए. विश्लेषणातुनही हीच गोष्ट समोर येते. माझे मित्र आणि पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील ज्येष्ठ



संशोधक प्रा. सुभाष वाळिंबे यांनी देशातील निरनिराळ्या मानवसमूहांचा अभ्यास आपल्या विद्यार्थ्यांच्या मदतीने चालविला आहे. त्यांनी केलेल्या मायटोकॉंड्रियन गुणसूत्रांच्या विश्लेषणावरून महाराष्ट्रातील कातकरी, वारली, महादेव कोळी, गवळी धनगर, मेंढपाळ धनगर आणि कुणबी या समूहांच्या गुणसूत्रांमध्ये कमालीची समानता आढळली आहे. हे सर्व समूह महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे वारसदार असावेत असे त्यांना वाटते (वाळिंबे व मुश्रीफ, २००१). जातीभेद करणे म्हणूनच मूर्खपणाचे आहे.

खरे तर ही एकात्मता सिद्ध करण्यासाठी सर्व्हे किंवा डी. एन. ए. चाचणी करण्याचीही गरज नाही. माणूस सगळा एकच एवढे म्हणले तरी पुरे आहे. थोड्या फार फरकाने सबंध भारतभर हीच प्रक्रिया घडली. वायव्येकडच्या प्रांतात आक्रमणांमुळे जास्त धुमश्चक्री होत राहिली, नवनवीन समूह येत राहिले, तुलनेने दक्षिण भारत जास्त संरक्षित राहिला एवढाच काय तो फरक. ह्या सर्वाचा सारांश असा की भारतात सुमारे २०,००० वर्षांपासून मानवी वसतीचे सातत्य आहे आणि एका अवस्थेतून दुसरी अवस्था उमलत आलेली आहे. गेल्या पंधरा ते वीस हजार वर्षांच्या काळात उपखंडातल्या हवामानात पुष्कळच बदल झाले आहेत, जगण्याच्या पद्धती बदलल्या आहेत, मानवी स्थलांतरे तर अनेक झाली आहेत. शिकार आणि अन्नसंग्राहक जीवन जगणाऱ्यांनी शेती व्यवसाय स्वीकारणे, पाऊसमान कमी होऊन पर्यावरण उजाड झाल्याने शेतकऱ्यांनी पशुपालनाकडे वळणे, शेतीत भागत नाही म्हणून काहींनी कायमचा व्यापारी पेशा स्वीकारणे, परकीय हल्लेखोरांपासून बचाव करण्यासाठी काहींनी परत जंगलाचा आणि दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेणे, शेतीच्या अर्थव्यवस्थेत काही समूहांना दास किंवा सेवक बनवले जाणे, काही समूहांनी जगण्यासाठी कायमचीच भटकंती स्वीकारणे आणि नवे नवे समूह समाजात सामील होणे अशा नानाविध प्रक्रिया या देशात निरनिराळ्या काळात घडलेल्या आहेत.

ह्या गुंतागुंतीच्या प्रक्रिया समजावून न घेता आर्यांनी सिंधू संस्कृतीचा नाश केला किंवा द्रविडांना पिटाळून लावले अशी अनैतिहासिक, अशास्त्रीय आणि पूर्वग्रहदूषित विधाने करणे वेडगळपणाचे आहे. त्याचप्रमाणे इथले आदिवासी हे कुणी वेगळे आणि ग्रामीण-नागरी समाज हा कुणी वेगळा असे समजणे चुकीचे आहे. मानवाच्या भारतातील आद्य वसाहतीचा काळ इतका आधीचा आहे की कोण आधीचे आणि कोण नंतरचे हा प्रश्न खरंतर गैरलागू आहे. आदिम काळापासून जे लोक इथे राहात होते आणि जे लोक निरनिराळ्या काळात इथे आले, त्यांच्यामधूनच इथला ग्रामीण आणि नागरी समाज निर्माण झाला आहे. आपल्याला इतिहास

आवडतो पण तो नजिकचा. लांबच्या इतिहासात आपण डोकावून बघत नाही. आधुनिक काळात जे समूह भारतात आले - म्हणजे मोंगल, हबशी (ॲबिसिनियन), पारशी, इराणी, पोर्तुगीज, इत्यादी - फक्त त्यांच्या बाबतीतच ते कधी आले याविषयी काही निश्चित मत व्यक्त करता येते. त्या पूर्वीच्या काळात जे आले म्हणजे ग्रीक, कुषाण, शक, हूण, वगैरे; त्यांची माहिती त्रोटक इतिहासावरूनच समजते. पण त्याशिवायचे जे लोक आहेत त्यांच्याबद्दल नक्की माहिती नाही. त्यामुळे लक्षात ठेवायची गोष्ट ती हीच की नाना प्रकारचे लोक इथे आले आणि इथल्या प्रवाहात सामील होऊन त्यांनी हा प्रवाह पुष्ट आणि समृद्ध केला. त्या प्रत्येकाने आपले काहीतरी योगदान ह्या परंपरेला दिले; कुणी प्रभावी भाषा दिली, कुणी शिल्पकला आणली, कुणी स्थापत्यशास्त्र आणले, कुणी कपड्यालत्त्यांची पद्धत बदलली. त्यातल्या काहींनी आपली काही वैशिष्ट्ये अबाधित ठेवली, काही पूर्णपणे नाहीसे होऊन गेले. त्यांच्या योगदानाने या परंपरेचा पोत बदलला, रंग बदलला. ज्यावेळी संघर्ष झाले तेव्हा काही पडझडही झाली, पण ही परंपराच पूर्ण नष्ट झाली असे झाले नाही. परंपरेच्या मूळ खोडावरच या निरनिराळ्या रोपट्यांचे आरोपण होत राहिले. हे मूळ खोडही अर्थात अशाच निरनिराळ्या समूहांनी बनलेले होते, फक्त ते कधी बनले ते आपल्याला माहीत नाही.

आदिवासी समाजाचे इतर समाजाशी असलेले एकरूपत्व सिद्ध करणारी महत्वाची गोष्ट म्हणजे अनेक चालीरीतींची समानता. आदिवासींच्या पारंपरिक देव-देवता जरी इतर



समाजापेक्षा वेगळ्या दिसल्या तरी बहुतांश चालीरीती ह्या बहुजन समाजासारख्याच आहेत. आणि देवतांचे वेगळेपण हे खरे तर निरनिराळ्या समूहांच्या वेगळेपणात आहे. सगळ्या भारतीय आदिवासी समाजाचा म्हणून एक देव नाही. भारतीय समाजात देवतांची विविधता प्रथमपासूनच आहे. प्रत्येक स्थानीय समूहाच्या आपापल्या स्वतंत्र देव-देवता असतातच. ह्या देवतांच्या प्रभावळीतूनच काही देवतांचे उन्नयन होऊन आजच्या प्रमुख देवता तयार झालेल्या आहेत. खरे तर भारताचे आजचे सर्व प्रमुख देव हे मुळचे इथले आदिम देवच आहेत.

ह्याचे सर्वात ठसठशीत उदाहरण म्हणजे महादेव किंवा शंकर. काळाच्या ओघात इतर अनेक देव मोठेपणाला चढले आणि उतरले, पण लिंगस्वरूप महादेवाचे स्थान अचल आहे. बहुतेक सर्व आदिम जमातींमध्ये महादेव किंवा तत्सम देवाची पूजा केली जाते. हीच गोष्ट देवी (आणि तिच्या यल्लम्मा, यमाई, मातंगी, जोगाई, इत्यादी अनेक लोकप्रतिमा), खंडोबा (स्कंदोबा - कार्तिकेय), नरसिंह, विठोबा, इत्यादी देवतांबाबतही खरी आहे. श्री. रा. चिं. ढेरे यांचे 'श्रीविठ्ठल एक महासमन्वय' हा ग्रंथ पाहिल्यास




लोकदेवतांचे उन्नयन कसे होते हे कळून येईल (ढेरे, १९८४). रामायण हे भारताचे एक प्रमुख महाकाव्य पण त्या रामायणाच्या निरनिराळ्या कथा निरनिराळ्या भागात प्रचलित आहेत (काही काही तर प्रमाणित रामायणापेक्षा भयंकर निराळ्या आहेत). आदिवासी समूहांतही रामायण प्रचलित आहे. रामायण हे मुळात इथल्या आदिम लोकपरंपरेतले काव्य असल्यास नवल नाही. रामायणाचा कर्ता 'वाल्या कोळी' होता ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. आदिवासींचे 'संस्कृतीकरण' झाले आणि म्हणून त्यांनी बहुजनसमाजाच्या देवता स्वीकारल्या असे समजले जाते. काही भागात व काही प्रमाणात ते खरे असेल, पण मुळात आदिम समजूती एक आहेत हे त्याचे खरे कारण आहे.

चालीरीतींच्या बाबतीत बोलायचे झाले तर बहुतेक सर्व आदिवासी समूहांमध्ये पितरांच्या पूजेला अनन्यसाधारण महत्व आहे. आदिवासी लोक एकवेळ इतर कोणताही सण साजरा करणार नाहीत पण पितरांची आठवण काढल्याशिवाय राहणार नाहीत. आज भारतीय समाजामध्ये 'पितर पंधरवड्या'ला असलेले महत्व हे आपल्या आदिम वारश्याचीच खुण आहे. हीच गोष्ट होळी, अक्षतृतीया, देव-दिवाळी, इत्यादी सणांच्या बाबतीत खरी आहे. सह्याद्रितील वारली, कातकरी, डोंगर कोळी या जमातींमध्ये पिठोरीचा सण साजरा केला जातो. हाच सण महाराष्ट्रातील बहुजन समाजातही साजरा केला जातो. भारतात साजऱ्या केल्या जाणाऱ्या बहुतेक सर्व सणात आपल्या आदिम जीवनाचीच रूपे सापडतात; मग तो सण होळीचा असो, गौरीचा असो वा नागपंचमीचा.

आदिवासींचा धर्म हा 'चैतन्यवादी धर्म' (ॲनिमिझम) आहे असे मानले जाते. भारतातील मुख्य धार्मिक परंपरा ही चैतन्यवादी म्हणजे 'जड' जगात चैतन्य मानणारी (किंवा जड व चैतन्य यांचे एकरुपत्व मानणारी) अशीच आहे. अध्यात्म आणि तत्वज्ञान यांच्या तथाकथित विकासाने ती दुर्बोध झाली आणि यज्ञ-विधी-व्रत-वैकल्यांमुळे सर्वसामांन्यापासून दुरावली; पण मुळात ती होती एकच.

आदिमत्व ठरवण्यातली दुसरी अडचण म्हणजे, ज्या समूहांना इतिहास नाही त्यांचे प्राचीनत्व समजणे कठीण असते. इतिहासपूर्व काळाची माहिती आपल्याला पुरातत्वशास्त्र म्हणजे आर्किऑलॉजी करून देते. उत्खननामधून घरांचे, गावांचे, अवजारांचे, भांड्यांचे जे अवशेष सापडतात त्यावरून त्या काळाविषयी अंदाज केले जातात. हडप्पा-मोहेंजोदडो विषयी जे आपण शिकलो ते अशा पुरातत्वीय संशोधनातूनच. पण पुरातत्वशास्त्राची प्रमुख मर्यादा अशी आहे की त्यातून त्या काळातल्या जीवनाविषयी माहिती



मिळत असली तरी ते लोक कोण होते ते समजत नाही. त्यांची भाषा कोणती होती ते समजत नाही. उत्खननात मृत माणसांचे सांगाडे मिळतात पण त्यावरून फक्त त्यांच्या शारीरिक ठेवणीचा अंदाज येतो.

मुख्य अडचण अशी आहे की समजा, पाच-सहा हजार वर्षापूर्वीची ताम्रपाषाणयुगीन वसाहत एखाद्या ठिकाणी सापडली तर आज जे लोक त्या ठिकाणी राहतात त्यांचा आणि त्या प्राचीन लोकांचा काय संबंध आहे हे ठरवता येतेच असे नाही. उदाहरणार्थ, आज जे लोक पुण्याजवळच्या इनामगावात राहतात त्यांचेच पूर्वज पूर्वी तिथे राहात होते का, हे निश्चित सांगता येणार नाही. शक्यता आहे की ते तसे असतील, पण नक्की सांगता येणार नाही.

मी एकदा राजस्थानात उदयपुरजवळ खजुरी नावाच्या एका भिल्लांच्या गावात गेलो होतो. हे गाव अतिशय गरीब आणि दयनीय अवस्थेत होते. त्याच्या शेजारीच अहाड नावाच्या ठिकाणी एक अतिशय वैभवशाली आणि समृद्ध अशी पाच-सहा हजार वर्षांपूर्वीची ताम्रपाषाणयुगीन संस्कृती सापडलेली आहे. अहाडमधल्या लोकांना भट्टीत तांबे वितळवून त्याची अवजारे करायची विद्या अवगत होती. त्या ठिकाणी सापडलेल्या मातीच्या भांड्यावरून ते फार हुन्नरबाज लोक असावेत असा अंदाज काढता येतो. आता आज त्या भागात असणारे भिल्ल हे अहाडमधल्या लोकांचेच वंशज असतील का? कदाचित असतील. तशा काही काही खुणा सापडतात. सध्याच्या भिल्लांच्या घरांचे नमुने अहाडमधल्या घरांच्या मांडणीशी तंतोतंत जुळतात आणि भिल्ल स्त्रियांच्या काळ्या वस्त्रांवर बांधणी पद्धतीचे जे पांढरे ठिपके दिसतात, तसेच ठिपके अहाडमधल्या मातीच्या भांड्यांवर दिसतात (सांकलिया व इतर, १९६९; बोकील,१९९४). पण हा तर्क झाला. ठोस काही सांगता येणार नाही.

आदिवासी कुणाला म्हणायचे याचे काही निकष ठरवून १९५० साली एक यादी (सूचि) तयार करण्यात आली आणि त्यात समाविष्ट केलेल्या समूहांनाच आदिवासी म्हणण्याची पद्धत पडली; पण त्यातले बहुसंख्य समूह हे भारताच्या आदिम शेतकरी समाजाचे घटक होते. आजही भारतातल्या प्रमुख आदिवासी जमाती ह्या 'शेतकरी' जमाती आहेत. महाराष्ट्रातल्या भिल्ल, गोंड, वारली, कोकणा, कोलाम, कोरकू, महादेव कोळी ह्या सर्व प्रमुख जमाती शेतीच्या आधारानेच उपजीविका करतात. आधी उल्लेख केल्याप्रमाणे हे सर्वजण महाराष्ट्राच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे वारसदार आहेत. ज्या संस्कृतीमधून इतर समाज घडला, त्याच संस्कृतीचे.

भारतातील समाजशास्त्रात एक सिद्धांत असा मांडला जातो की इतिहासाच्या ओघात अनेक आदिवासी समूह हे शूद्र-अतिशूद्र जाती

म्हणून ग्रामीण समाजाचा भाग बनले. ही प्रक्रिया विशेषत्वाने गंगा-यमुनेच्या खोऱ्यात घडली. इतर म्हणजे दक्षिण-पूर्व व पश्चिम भारतात मात्र त्यांनी तुलनेने आपले स्वतंत्र अस्तित्व राखले. काहींचे असेही म्हणणे आहे की गंगा-यमुनेच्या दोआबात मुळच्या आदिवासी समूहांना नंतर आलेल्या लोकांनी जिंकून आपले दास बनवले. इतर भागात तसे घडू शकले नाही आणि म्हणून तिथे आदिवासी जमाती स्वतंत्र आणि वेगळ्या राहिल्या.

हे सिद्धांत काही प्रमाणात वैदिक वाङ्मय व रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांवर आणि मुख्यत: तर्कावर आधारलेले आहेत. अर्थात ही प्रक्रिया घडली नसेल असे नाही कारण आज गंगा-यमुनेच्या प्रदेशात आदिवासी म्हणजे अनुसूचित जमाती जवळ जवळ नाहीत; पण पूर्वी असणारच. त्यांचे रुपांतर ग्रामीण समाजात झाले असणे शक्य आहे. तसे होताना अनेक शूद्रातिशूद्र किंवा पूर्वास्पृश्य जाती निर्माण झाल्या असाव्यात. मात्र काही समूहांचे रूपांतर मध्यम किंवा उच्च जातीतही झाले असणे शक्य आहे. कारण ऐतिहासिक काळात युद्ध आणि पराभव एवढी एकच प्रकिया घडलेली नाही. सरमिसळीच्या नानाविध प्रक्रिया घडलेल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर संकरही झालेला आहे. हा संकर जाती-व्यवस्थेची कल्पना उदयास येण्याआधीपासून होत असणार. तो केवळ जित व जेते यांच्यामधला संकर नाही, त्यापेक्षा आदिम व सखोल प्रक्रियांमधून घडलेला आहे. काळाच्या ओघात काही समूह हे उच्चीला चढले तर काही दास्यत्वाच्या गर्तेत कोसळले. काही आदिम अवस्थेतून सत्ताधारी बनले तर काहींवर डोंगर-दऱ्यात लपून जीवन कंठण्याची पाळी आली. पण ते सर्व मुळात भारतीय समाजाचाच हिस्सा होते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे दक्षिण-पूर्व किंवा पश्चिम भारतात आदिवासी जमातींनी स्वतंत्र अस्तित्व राखले याचा अर्थ ते भारतीय ग्रामीण समाजाच्या परंपरेचा हिस्सा नव्हते असा नाही. भिल्ल, गोंड, कोरकू, वारली अशा समुहांचे स्वतंत्र अस्तित्व (म्हणजे जंगल, डोंगर-दऱ्यातल्या विलग वसाहती) हे फार अलीकडच्या काळात तयार झालेले आहे. काही अंशी त्यांचे हे विस्थापन मध्ययुगात सुरू झाले असावे. मुस्लिम आक्रमणांच्या काळात अनेक आदिवासी समूह आपल्या पारंपरिक ठिकाणापासून ढळले असल्याचे दिसते. अशीच काहीशी प्रक्रिया ब्रिटिशांच्या राजवटीत झाली. त्या काळात अनेक भटक्या जातींना 'गुन्हेगार जाती' कसे ठरवण्यात आले हा इतिहास ताजा आहे.

भारतीय ग्रामीण समाजाचे दुसरे नाव 'जातीनिष्ठ' समाज असे आहे. आता आदिवासी समूहांना 'जमात' म्हणून ओळखले जाते, पण म्हणून ते ग्रामीण समाजापेक्षा वेगळे आहेत असा निष्कर्ष काढता येणार नाही. ह्याची कारणे दोन. एक म्हणजे व्यावहारिक पातळीवर कोणत्याही समूहाला भारतात एक 'विशिष्ट जात' म्हणूनच वागवले जाते. कातकरी असोत, वारली असोत वा कोकणा, बाकीचे लोक व्यवहारात त्यांची एक वेगळी जात आहे असेच समजतात. आणि ते आपल्याच समूहात लग्ने करत असल्याने 'जात' म्हणून त्यांची बांधणी होतेच.(हिंदीत अनुसूचित जन-जाति असाच शब्द प्रयोग आहे). 'जमात' हा फारसी शब्द आहे, तो अगदी अलीकडच्या

काळात वापरात आला. प्राचीन समुहांना तो कसा लावता येईल? त्याच्या वापरातही गोंधळ होतोच. उदाहरणार्थ, आपण विमुक्त जाती व भटक्या जमाती असे म्हणतो, ते का? वडार ही जात व बेलदार ही जमात असे कसे म्हणून चालेल?

दुसरे कारण म्हणजे आदिवासी क्षेत्रात त्यांचाच एक गावसमाज तयार होतो. उदाहरणार्थ, ज्या प्रदेशात भिल्ल वा गोंडच राहतात तिथे त्यांच्या वस्तींची उभारणी ही गाव समाजाच्या धर्तीवरच झालेली आहे. गोंड आणि भिल्लांची राज्ये तर होतीच पण त्यांच्या शेतकी वसाहतींना बलुतेदारांप्रमाणे मदत करणारे वा त्यांची सेवा-चाकरी करणारे इतर गट वा जाती होत्याच. श्रमविभागणीच्या विस्तारात वा उच्च-नीचतेच्या कल्पनांत फरक असेल, पण कुणब्यांच्या आणि गोंडांच्या गावात गुणात्मक फरक नव्हता.

लक्षात ठेवण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे आज आदिवासी लोक ज्या ठिकाणी राहतात तेच त्यांचे आद्यतन निवासस्थान आहे किंवा होते असे नाही. भिल्ल किंवा गोंड यांसारख्या विस्तृत प्रदेशावर पसरलेल्या समूहांच्या बाबतीत हे काही प्रमाणात खरे असेल पण इतर अनेक लहान समूहांची स्थलांतरे झालेली आहेत. उदाहरणार्थ, सह्याद्रिमध्ये ठाकर ही जमात आहे. या जमातीचे लोक आपण मुळात राजस्थानातून आलो असे समजतात. आता राजस्थानशी संबंध दाखवण्यासारखे त्यांच्याकडे काही उरलेले नाही, पण त्यांच्यामधला तोंडी (मौखिक) इतिहास आपण महाराष्ट्राच्या उत्तरेस असलेल्या महाल भागातून आलो असा पुरावा देतो. तसेच उत्तर महाराष्ट्रातील कोकणा ही जमात मुळात दक्षिणेकडच्या कोकण भागातून आली असे समजले जाते. अशी उदाहरणे अनेक सापडतील. दुष्काळ, परकीय आक्रमणे, जुलूमी राजवटी, पर्यावरणातील बदल अशा निरनिराळ्या कारणांमुळे आदिम समूहांची स्थलांतरे झालेली आहेत.

ह्या सगळ्याचा सारांश असा की भारतामध्ये मानवी वसाहतीचे सातत्य फार मोठ्या काळापासून असल्यामुळे इथे कोण आधीचा आणि कोण नंतरचा हे ठरवणे कठीण आहे, तसा शोध निरर्थक तर ठरेलच पण गैरलागूही. इतिहासाच्या कोणत्या टप्प्यावर भारतात कोण आले हा मुद्दा महत्वाचा नाही. इथे राहत असताना कोणी कोणती जीवनपद्धती स्वीकारली आणि कसे राहत आले हे महत्वाचे आहे. त्या जीवनपद्धतीमुळे काही लोकांना 'आदिवासी' म्हणायला हवे. आज ज्यांना आपण आदिवासी म्हणतो त्यापैकी बहुतांश लोक या भूमितील आधीपासूनचे रहिवासी आहेतच, परंतु तथाकथित मुख्य समाजातही असे आदिम घटक आहेत. इथला बहुजन समाजही त्यांमधूनच तयार झालेला आहे. इतिहासाच्या विशिष्ट टप्प्यांवर काही समूहांचा ग्रामीण-कृषक-शहरी समाज बनला तर काही डोंगर-दऱ्यात आश्रयाला गेले. जे डोंगर-दऱ्यात गेले ते दुर्लक्षित राहिले, त्यांच्यावर अन्याय झाला म्हणून त्यांना घटनात्मक संरक्षण व आरक्षणादी फायदे दिलेच पाहिजेत. परंतु हेही लक्षात ठेवले पाहिजे की आदिवासींचे वेगळेपण हे ऐतिहासिक आहे; वांशिक नाही. भारतातला आदिवासी समाज हा इतर समाजांहून भिन्न नाही. तो याच समाजाचे मूळ, खोड, फांद्या, पाने, फुले, फळे - सर्व काही आहे.

(कातकरी या आगामी प्रकाशनातून) ■■

# बस्तर - एक निसर्ग सुंदर प्रदेश

डॉ. धैर्यशील शिरोळे

छत्तीसगड ह्या नव्याने निर्माण केलेल्या गेलेल्या राज्याची सविस्तर माहिती निवडक लोकांनाच आहे. पूर्वीच्या मध्यप्रदेश राज्यातून हा विभाग वेगळा करुन याची स्थापना केली आहे. याच्या पूर्वेला झारखंड आणि ओरिसा, पश्चिमेकडे महाराष्ट्र दक्षिणेकडे आंध्रप्रदेश आणि उत्तरेला उत्तर प्रदेश आहे. रायपूर ही या नव्या प्रांताची राजधानी आहे. ह्या प्रदेशातील भास्कल, गुड्डा, पामुल, गौतमी, शांखिनी, डंकिनी, बांदिया या छत्तीसगड पर्वतश्रेणीतून वाहणाऱ्या नद्यांना बरोबर घेऊन इंद्रावती ही मुख्य नदी आंध्रप्रदेशच्या आणि महाराष्ट्राच्या सीमेवर गोदावरीला मिळते. ह्या प्रदेशात गोंड, माडिया, भत्ता, मुरिया, हळबा, बिसनशिंगी माडिया, डोरला, कोया, परधान, परजा, कोंध आणि दुर्वा ह्या जमाती आणि त्यांच्या उपजमाती आढळतात.

बस्तरमधील सर्वसामान्य बोलीभाषा हळबा आहे; पण इतर अनेक बोलीभाषा वापरात आढळतात. अडीचशे तीनशे वर्षापूर्वी मराठा सैनिकांनी ह्या प्रदेशात प्रवेश केला आणि ते तेथेच स्थायिक झाले. अनेक प्राँतांनी वेढलेल्या छत्तीसगड राज्यावर या राज्यांचा सांस्कृतिक प्रभाव पडलेला आढळतो. १९८१ साली केलेल्या जनगणनेनुसार येथील प्रतिचौरस किलोमीटर प्रदेशात ४७ जनसंख्या आढळली.

पुरातत्त्वाचा जुना पुरावा भोंगलपाल येथील पाचव्या शतकातील बौद्ध अवशेषांच्या रुपात आढळतो. नाग, गंग, काकतीय, चालुक्य, चोळा, होयसठ या राजवंशाचा बस्तरशी राज्यकर्ते म्हणून संबंध आल्याचा पुरावा आहे. इंद्रावती नदी बस्तरच्या मध्यभागातून पूर्व पश्चिम वाहते. उत्तरेकडील भागांवर नागर संस्कृतीचा तर दक्षिणेकडील भागावर तेलगू संस्कृतीचा प्रभाव आहे.

बस्तर मधील सुंदर निसर्गाचा आनंद घेताना, आदिवासी जीवनाची ओळख करुन घेणे उपयुक्त आहे. त्यांची काम करण्याची क्षमता, एकमेकांमधील सहकार्य, एकसंध समाजजीवन, त्यांचे उत्सव, नृत्यप्रकार, विवाह प्रथा, स्त्रीचे समाजातील स्थान ह्या गोष्टींचा अभ्यास करण्यासारखा आहे. त्यांची रंगीबेरंगी वस्त्रे, सुंदर कलापूर्ण आभूषणे, त्यांचे बाजार, जत्रा, सुंदर, लयबद्ध पदन्यास असलेली त्यांची नृत्ये निश्चितच प्रेक्षणीय आहेत.

ह्या भागातल्या आदिवासींच्या जीवनातला महत्त्वाचा भाग म्हणजे आठवडे बाजार, त्याला ते हाट असे म्हणतात. आसपासच्या जंगलातून गोळा केलेली फळे, कंदमुळे, डिंक, चिंच, मध, चारोळ्या, स्वतः तयार केलेल्या बांबूच्या अनेक प्रकारच्या टोपल्या, विविधप्रकारची दारु ह्या बाजारात

विकण्यात येते. काही पदार्थांची देवाण घेवाण होते.

बाजारात आदिवासी तरुणतरुणी एकमेकांना भेटतात. तरुण मुले त्यांना आवडलेल्या आदिवासी मुलीला त्यांनी स्वत: तयार केलेला कलापूर्ण कंगवा भेट देतात. ज्या आदिवासी तरुणीला जास्तीत जास्त कंगवे दिले जातात ती त्या जमातीतील सर्वांत सुंदर मुलगी समजली जाते. विवाह ठरल्यावर ती भावी पतीचा कंगवा स्वत:जवळ ठेवते आणि बाकीचे कंगवे ज्याचे त्याला परत करते. विवाह प्रसंगातील आणि इतर सणासुदीच्या वेळी केलेले आदिवासी परंपरेला धरुन असते मोहाचे मद्य पिऊन हे आदिवासी रात्रभर जोशाने नाचू शकतात.

बस्तरच्या आदिवासींमधील काही उत्तम कलाकार आहेत. ओतीव मूर्तिकाम करण्याची त्यांची परंपरा आहे. त्यांनी तयार केलेल्या मूर्ती पंचतारांकित होटेलमधे शोभेसाठी ठेवण्यात येतात. डॉ. जयदेव बघेल ह्या कलाकाराला डी.लिट्. देऊन गौरविण्यात आले आहे. लंडन आणि पॅरिस येथील कला संस्थांनी त्यांच्या कलेचा सन्मान केला आहे. कोंडागाव या ठिकाणी या कलाकरांची वस्ती आहे.

बस्तरचे आदिवासी वर्षातून सात आठ मोठे उत्सव साजरे करतात. त्यांचा संबंध पंचमहाभूतांशी आणि निसर्गातील ऋतुंविषयी असतो. सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे दसरा. आदिवासींची सर्वमान्य आणि सर्वश्रेष्ठ देवता म्हणजे दंतेश्वरी माता हे पार्वतीचे रुप आहे. तिच्यासंबंधी अनेक कथा उपलब्ध आहेत. शंखिणी, डंकिणी या नद्यांच्या संगमावरील दंतेवाडा ह्या गावात दंतेश्वरी मातेचे मोठे मंदिर आहे. दसऱ्याला या देवीचा मोठा उत्सव असतो. त्यासाठी बस्तर विभागातील हजारो आदिवासी जमतात. चौदा दिवसाचा हा उत्सव असतो आणि त्यात समाजातील प्रत्येक घटकाचा वैशिष्ट्यपूर्ण सहभाग असतो. राजाला रथात बसवून जुन्या परंपरेनुसार मिरवणूक काढली जाते.

बस्तरचे ओझरते दर्शन घेण्यास सात दिवस लागतात. बस्तरला जाण्यास विशाखापट्टणमहून रेल्वे उपलब्ध आहे. उत्तरेकडून बस्तरला जाण्यासाठी रायपूर या राजधानीच्या ठिकाणी रेल्वे आणि आगगाडी उपलब्ध आहे. रायपूरहून सहा तास मोटारने प्रवास करुन जगदलपूर पोहोचता येते. तेथे आता प्रवाशांसाठी उपयुक्त सोयी उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

जगदलपूरहून कांगेर राष्ट्रीय उद्यानात जाऊन तेथील आदिवासींच्या झोपड्यांना भेट देता येते. त्या भागात असलेल्या दुर्मिळ गुहा पाहता येतात. जवळच तीरथगडचा नयनमनोहर धबधबा पाहता येतो. तिसऱ्या दिवशी जगदलपूर चित्रकोट हा प्रवास करता येतो. चित्रकोटचा धबधबा इंद्रावती नदीवर आहे आणि तो शंभर फूट उंचीवरुन कोसळतो बस्तरमधील हेराकोटाच्या मूर्ती फार देखण्या असतात एक दिवस जगदलपूरच्या बाजारातील वैविध्यपूर्ण वस्तू पाहण्यात, खरेदी करण्यात, बोलकी मैना पाहण्यात जगदलपूरमधील प्रेक्षणीय मंदिरे स्थळे पाहण्यात आणि महत्त्वाच्या व्यक्तींना भेटण्यास व्यतीत करता येतो. जगदलपूरच्या आणि

दंतेवाड्याच्या दक्षिणेला बैलाडिसा येथे खजिनांच्या मोठ्या खाणी आहेत. हा प्रकल्प प्रचंड असून पाहण्यासारखा आहे. खाणशास्त्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान येथे वापरले आहे.

कवर्धा, कांकेर, खैरागड इत्यादी जुन्या ऐतिहासिक ठिकाणांना भेट देऊन तेथील कलापूर्ण राजप्रासाद आपण पाहू शकतो. बस्तर क्षेत्रातील पर्यटन हा एक खूप दिवस लक्षात राहील असा निसर्गाचा अनुभव आहे. शुद्ध हवेत, हिरव्यागार दाट वृक्षराजीच्या सान्निध्यात, भोळ्या भाबड्या आदिवासींबरोबर व्यतीत केलेले दिवस एका वेगळ्या भारताची ओळख करुन देतात. आदिवासींच्या जीवनशैलीचा अभ्यास करुन आपल्या शहरी जीवनपद्धतीत काही सुधारणा करता येतील.

आदिवासी प्रदेशाची सहल करून आल्यावर आपण अंतर्मुख होतो आणि या आपल्या बांधवांसाठी आपण काय करु शकतो असा विचार मनात येतो. शहरातील सुशिक्षित जनता आदिवासींच्या प्रश्नांबद्दल बौद्धिक चर्चा करुन काही उपाय सुचविण्याचा प्रयत्न करतात. आदिवासी जीवनाची सखोल माहिती आणि अभ्यास नसल्याने या सर्व सूचना अव्यवहार्य ठरतात. आदिवासींसाठी आखल्या गेलेल्या योजनांचे जनक शहरात राहणारे असतात आणि त्यांना आदिवासींच्या जीवनातील असंख्य अडचणींची जाणीव नसते म्हणून या योजना कुचकामी ठरतात.

हजारो रुपये खर्च करुन परदेशी जाण्याची प्रथा रुढ होऊ पाहात आहे. सिंगापूर, थायलंड, हाँगकाँग, अबूधाबी इत्यादी ठिकाणी जाऊन येणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे मानले जाते. आपल्या देशात सर्व ठिकाणी अत्यंत प्रेक्षणीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक भौगोलिक ठेवे आहेत. त्यांना आपण भेट दिल्यास त्या ठिकाणांची सुधारणा होईल आणि त्या त्या भागांतील लोकांना आर्थिक फायदा होईल आणि त्यांचे जीवनमान सुधारेल. स्थानिक लोक अनेक प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू निर्माण करतात, त्यांची अवश्य खरेदी करावी. ही तेथील लोकांना मोठी मदत ठरेल.

भारतातील आदिवासी क्षेत्रातील प्रेक्षणीय आदिवासी स्थळांना भेट देऊन, त्या त्या विभागासंबंधी भाषणे देऊन इतरांना अशा ठिकाणी जाण्यास प्रोत्साहित करावे. बस्तरचा आणि महाराष्ट्राचा जुना ऐतिहासिक संबंध आहे तो आपण जोपासला पाहिजे.

■■

## लेखकांना आवाहन

हाकारा त्रैमासिकाने गेली २५ वर्षे अखंडपणे आदिवासी जीवन, संस्कृती, समस्या, कला, साहित्य आदी गोष्टींची ओळख इतर पांढरपेशी-नागर समाजाला करुन दिलेली आहेच. परंतु त्याचबरोबर आदिवासी नवसाहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ हाकाराच्या रुपाने मिळाले आहे.

अशा या नियतकालिकात आणखीही काही कार्यकर्त्यांना आपले विचार मांडायचे असतील, लेखक-कवींना आपले साहित्य प्रसिद्ध व्हावे असे वाटत असेल, तर जरुर लिहावे व आमच्याकडे पाठवावे. पत्ता अंकात दिलेला आहेच.

## हाकारा अंक सूची

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन २. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन ४. आदिवासी साहित्य व कला

१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य ३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना

१९८२ - १. धरणे व विकास २. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन

१९८३ - १. आदिवासी व दारु
२.आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री ४. आदिवासी आरोग्य व शिक्षण

१९८५ - १. आदिवासी संघटन २. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला ४. आदिवासी व सरकार

१९८६ - १. जंगल व धरण २. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासीविषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय

१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणी सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न

१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन

१९९० - १-२. महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक आदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जिवन व संस्कृती

१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक

१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन

१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती

१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक ४. पर्यावरण विशेषांक

१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा आदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण

१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक

१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास

२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणी पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती

२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१

२००२ - १. आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणी विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी
उपाययोजना

२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज ४. आदिवासी संस्कृती

२००४ - १. पुस्तक परिचय

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास )

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होत. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेने एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षे परिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाव्दारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याव्दारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाव्दारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ्य व विकास संशोधन केंद्र २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

### महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये ( व्यक्तींसाठी ) हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये ( संस्थासाठी )
परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी )

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस ) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

### पत्रव्यवहाराचा पत्ता

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद , ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद